| ११ वी | २९ | ४८ | ७७ |
| १२ वी | ४६ | ४४ | ९० |

# वराडकर इंग्लिश मिडीअम स्कूल, कट्टा.

## शालेय मंत्रिमंडळ २०२४-२५

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | इयत्ता | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | चंदन गुर्जर | ९ वी | मुख्यमंत्री/शिक्षणमंत्री |
| २. | त्रिशा रेवडेकर | ५ वी | उपआरोग्य मंत्री |
| ३. | परी वायंगणकर | ६ वी | सांस्कृतिक मंत्री |
| ४. | प्राची गुराम | ७ वी | शिक्षणमंत्री |
| ५. | सर्वेश सरमळकर | ८ वी | उप सांस्कृतिक मंत्री |
| ६. | नेस्टर लोबो | ९ वी | क्रीडा मंत्री |
| ७. | स्वरूप शंकरदास | ११ वी | शिस्त मंत्री |
| ८. | पार्थ नलावडे | १२ वी | उप क्रीडा मंत्री |
| ९. | जाई आंबेकर | १० वी | आरोग्यमंत्री/शिस्त मंत्री |

## शालेय निकाल सन २०२४–२५

| अ.क्र. | परिक्षा | परिक्षेस बसलेले | उत्तीर्ण झालेले | शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. परीक्षा २०२४ | १४ | १४ | १००% |
| २. | एच.एस.सी. परीक्षा २०२४ | ७३ | ७३ | १००% |
| ३. | चित्रकला एलिमेंटरी | ५ | ५ | १००% |
| ४, | चित्रकला इंटरमिजीएट | ६ | ६ | १००% |
| ५. | रंगोत्सव चित्रकला स्पर्धा | १९ | १९ | १००% |

## इयत्ता १० वी (शालांत परीक्षा) मार्च : २०२३–२४

| | |
|---|---|
| प्राची राजेश परुळेकर | ९९.२०% |
| तन्मय प्रमोद परब | ८८.८०% |
| आर्या आनंद टेमकर | ८०% |

## एस.एस.सी. – २०२३

| एकूण प्रविष्ठ विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | उत्तीर्ण श्रेणी | निकाल |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १४ | ६ | ८ | – | – | १००% |

## इयत्ता १२ वी उच्च माध्यमिक परीक्षा मार्च –२०२३

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | रिया रमाकांत गोसावी | – | ९०% |
| २. | आनंदी सदानंद परब | – | ८५.३३% |
| ३. | दिक्षा विश्वनात कदम | – | ८४% |

❊ शिक्षण हे माणसाच्या जीवनाचा दिशा ठरवते. **– डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
❊ शिक्षण हे आपल्या विचारशक्तीला आकार देणारे आहे. **– महात्मा गांधी**
❊ शिक्षणानेच माणसाची मूल्यं, आचारधर्म आणि समाजाप्रती उत्तरदायित्व उभं राहते. – **पं. नेहरू**
❊ जीवनात कितीही यश मिळवलं तरी शिक्षणाचा किमान एक डिग्री असावा. **– लोकमान्य टिळक**

# वराडकर इंग्लिश मिडीअम स्कूल, कट्टा.

## पालक शिक्षक संघ २०२४-२५

| अ.क्र. | पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. ऋषिकेश रवी नाईक, मुख्याध्यापक | अध्यक्ष |
| २. | श्री. अभय अंकुश वाईरकर, सीनिअर के.जी. पालक | उपाध्यक्ष |
| ३. | सौ. प्रगती सुशील राणे, सहा. शिक्षक | सचिव |
| ४. | श्री. अमोल कदम, नर्सरी पालक | सदस्य |
| ५. | श्री. अमित पालव, इयत्ता २ री पालक | सदस्य |
| ६. | श्री. दीपक आचरेकर, इयत्ता ३ री पालक | सदस्य |
| ७. | श्री. हेमंत माळकर, इयत्ता ९ वी पालक | सदस्य |
| ८. | श्री. राजेश परुळेकर, इयत्ता ८ वी पालक | सदस्य |
| ९. | श्री. सिद्धार्थ पेणकर, सीनिअर के.जी. पालक | सदस्य |
| १०. | श्री. सुनिल रावले, इयत्ता ११ वी पालक | सदस्य |
| ११. | श्री. अनिल कदम, नर्सरी पालक | सदस्य |
| १२. | श्री. रविंद्र परुळेकर, इयत्ता ६ वी व १० वी पालक | सदस्य |
| १३. | श्री. मुनिर शेख, इयत्ता १ ली पालक | सदस्य |
| १४. | श्री. प्रमोद परब, इयत्ता ४ थी पालक | सदस्य |
| १५. | सौ. छाया वायंगणकर, सीनिअर के.जी. पालक | सदस्य |
| १६. | सौ. स्वराली जबडे, नर्सरी पालक | सदस्य |
| १७. | सौ. सोनिया राऊळ, इयत्ता ५ वी पालक | सदस्य |
| १८. | सौ. रूही प्रभुलकर, इयत्ता ९ वी पालक | सदस्य |
| १९. | सौ. दिक्षा रेवडेकर, इयत्ता ५ वी व १० वी पालक | सदस्य |
| २०. | सौ. तनुजा, इयत्ता १२ वी पालक | सदस्य |
| २१. | सौ. मनाली हंजनकर, इयत्ता ११ वी पालक | सदस्य |
| २२. | सौ. स्वरा सावंत, सीनिअर के.जी. पालक | सदस्य |
| २३. | सौ. समृद्धी हिंदळेकर, सीनिअर के.जी. पालक | सदस्य |
| २४. | सौ. नूतन रावले, इयत्ता ९ वी पालक | सदस्य |
| २५. | सौ. श्रद्धा गुराम, इयत्ता ८ वी पालक | सदस्य |
| २६. | सौ. संजना मिठबावकर, इयत्ता ५ वी पालक | सदस्य |
| २७. | सौ. हेमांगी काळसेकर, इयत्ता ४ थी पालक | सदस्य |
| २९. | सौ. अमृता मुणगेकर, इयत्ता ७ वी पालक | सदस्य |

# वार्षिक क्रीडा अहवाल २०२४.

महाराष्ट्र, ऑलिम्पियाड मोमेंट (MOM) स्पर्धा स्मिता कॉम्प्युटर (कट्टा) येथे घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये आपल्या प्रशालेचा विद्यार्थी कु. नवनीत सोमनाथ परब (इयत्ता ९ वी) याने जिल्हास्तरीय ३ रा क्रमांक पटकावला. मा. श्री. अजयराज वराडकर व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड (BIS) ही स्पर्धा आमच्या प्रशालेमध्ये ऑनलाईन घेण्यात आली होती. यामध्ये आपल्या प्रशालेचा विद्यार्थी कु. नवनीत सोमनाथ परब (इयत्ता ९ वी) याने विभागस्तरीय पहिला क्रमांक घेऊन यश संपादन केले.

रंगोत्सव सेलिब्रेशन ही चित्रकला स्पर्धा, संपूर्ण महाराष्ट्रात विविध स्तरांवरच्या शाळेमध्ये घेण्यात येते. आमच्याही प्रशालेने या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये एकूण १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये कु. चैतन्य प्रविण नाईक (इयत्ता ८ वी) याने आर्ट मेरीट ॲवॉर्ड व ट्रॉफी देऊन त्याला सन्मानित करण्यात आले.

जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धा कनेडी येथे घेण्यात आली होती. यामध्ये आमच्या प्रशालेची विद्यार्थिनी कुमारी अपूर्वा विनायक मालवणकर (इयत्ता १२ वी) हिने जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावून आमच्या शाळेचे नाव उज्ज्वल केले.

जिल्हास्तरीय योगा स्पर्धा कासार्डे येथे घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये आपल्या प्रशालेची विद्यार्थिनी कुमारी गौरवी राघोबा मिठबावकर (इयत्ता १२ वी) हिने जिल्हास्तरीय दुसरा क्रमांक पटकावला.

जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा रत्नागिरी येते घेण्यात आली होती.

## विद्यार्थ्यांचे स्वागत :

सन २०२२-२४ हे शैक्षणिक वर्ष जून महिन्यापासून सुरू झाल्यानंतर शाळा प्रवेशाचा कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. ऋषिकेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमात मुलांना चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. मुलांना पहिला दिवस असल्याने विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पालक वर्ग, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## शिक्षक दिन साजरा :

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन दि. ५ सप्टेंबर रोजी देशभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्याही प्रशालेमध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक श्री. ऋषिकेश नाईक यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी शिक्षक व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. या कार्यक्रमात मुलांनी शिक्षकांची नक्कल करून शिक्षकांचे मनोरंजन केले व शिक्षकांना गुलाब पुष्प देऊन मुलांना शिक्षकांचे आशिर्वाद प्राप्त केले.

## आषाढी एकादशी :

आषाढी एकादशी हा सण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो आमच्या ही प्रशालेमध्ये आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. यामध्ये मुलांनी विठ्ठल रखुमाईची वेशभूषा करून. वारकरी बनून बाजारपेठमध्ये

वारकरी दिंडी काढून टाळ आणि मृदुंगाच्या गजरात 'जय जय राम कृष्ण हरी' हा गजर घेऊन संपूर्ण कट्टा बाजारपेठ विठ्ठलाच्या गजरात दुमदुमून गेली.

## दिवाळी :

आमच्या प्रशालेमध्ये दिवाळी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये मुलांनी विविध प्रकारचे आकाश कंदील बमवून प्रशालेत लावण्यात आले व काही मुलांनी दिवाळी ग्रिटींग कार्ड बनवून शिक्षकांना दिपावलीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. त्यानंतर मुलांना फराळ वाटप करून त्यांचे तोंड गोड केले.

## सावित्री बाई फुले जयंती :

आमच्या प्रशालेमध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. आमच्या शाळेचे मुख्याध्यापक यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांचे स्मरण करण्यात आले. मुलांनी फुले यांच्याबद्दल भाषणातून त्यांना मानवंदना देण्यात आली.

## डॉ. काकासाहेब वराडकर यांची पुण्यतिथी :

आमच्या प्रशालेमध्ये डॉ. काकासाहेब वराडकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती मा. श्री. अजयराज वराडकर यांनी काकासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. त्याचबरोबर शाळेचे उपाध्यक्ष, सचिव, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. मुलांनी डॉ. काकासाहेब वराडकर यांच्याबद्दल भाषण करून त्यांच्या स्मृतीस वंदन केले. त्यानंतर मा. अध्यक्ष श्री. अजयराज वराडकर यांनी डॉ. काकासाहेब यांच्या आठवणी व्यक्त केल्या.

## वार्षिक स्नेहसम्मेलन :

वराडकर इंग्लिश मीडियम स्कूल कट्टाचे वार्षिक स्नेहसंमेलन अध्यक्ष श्री. अजयराज वराडकर व सचिव, उपाध्यक्ष, सल्लागार व इतर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. मुलांनी विविध प्रकारचे नृत्य, नाट्य सादर केले.

## दर शनिवारी घेण्यात योणारे उपक्रम :

१) मातीपासून दागिने बनवणे.
२) रांगोळी काढणे.
३) भेल स्टॉल.
४) सुंदर हस्ताक्षर उपक्रम.
५) योगा, कराटे याचे प्रशिक्षण.
६) विविध खेळांची प्रात्यक्षिके.
७) वाचन कार्यक्रम.
८) वाद्य व संगीत प्रशिक्षण.
९) मातीपासून मूर्ती बनविणे.
१०) क्राफ्ट वॉल हँगिग प्रशिक्षण.

'वंदना' वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



संकेत एस. केळवलकर

# एस. के
# कृषी सेवा केंद्र

सर्व प्रकारची रासायनिक व
सेंद्रिय खते, औषधे, बी-बियाणे व
कृषी अवजारे मिळतील.

मु. पो. सुकळवाड, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
मोबा. : ९४०४९१६१६०.

'वंदना' वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



# श्री. विनोद प्रकाश सावंत

पेंडूर, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
मोबा. : ९७६५८०९३०९.

'वंदना' वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



# श्री महालक्ष्मी जनरल स्टोअर्स

पेंडूर, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग-४१६ ६०४.
मोबा. : ९६०४०३८४७८

प्रोप्रा. सिताराम शिरसाट

'वंदना' वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



# कु. भावना आनंद चव्हाण

कट्टा, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
मोबा. :

‘वंदना’ वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!

# मिठबावकर असोसिएटस

कुसरवे-वराड, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
मोबा. : ९४२२२३५८५१.
ई-मेल : mithbaonkar11@gmail.com

**प्रोप्रा. : श्री. प्रविण मिठबावकर**
**ॲड. प्रदिप मिठबावकर**

‘वंदना’ वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!

# कुडाळकर फोटो स्टुडिओ

**अर्जंट पासपोर्ट साईज कलर फोटो फक्त ५ मिनिटांत**

कार्यक्रमाच्या फोटोग्राफी व व्हीडीओग्राफीच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.

कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
मोबा. : ८६६९८४५८२५, ९४२११४७२६३

**प्रोप्रा. : प्रसाद मधुकर कुडाळकर**

‘वंदना’ वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!

॥ श्री लिंगेश्वर ईस्वंटी महापुरुष भराडी प्रसन्न ॥

# स्वामी नरेंद्र गॅरेज

**टू-व्हीलर स्पेशालिस्ट स्पेअरपार्टस् मिळतील.**

गुरामवाडी, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
मोबा. : ८६००८३१७९७, ८३७९८५७३१७

**प्रोप्रा. नरेंद्र मधुसुदन पाडावे**

‘वंदना’ वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



# श्री भालचंद्र मेडिकल स्टोअर्स

**केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट**

**देशी-विदेशी औषधे-सौंदर्य प्रसाधने तसेच जनावरांची औषधे मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण.**

भरड नाका, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
मोबा. : ९६५७७४४०४१७

**प्रोप्रा. : भारत मालोंडकर**

# गेले द्यायचे राहून, तुझे नक्षत्रांचे देणे !

**ऋषी श्रीकांत विजयश्री देसाई** सल्लागार,
कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाची सल्लागार कमिटी



एखाद्या माणसांच्या आकंठ प्रेमात असावं, आणि त्याने अचानक तुमचा हात सोडून जावा.. आणि त्यानंतर आयुष्यभर फक्त त्यांच्या आठवणीत जगावं ही गोष्ट माझ्यासह अनेकांच्या पदरात ओंजळीने वाटत संजय नाईक सर का एवढ्या लवकर दूरच्या प्रवासाला निघून गेले हा अनुत्तरीत प्रश्न अनेकांना सलतोय.. आमच्या वराडकर हायस्कुल कट्टाचे सहाय्यक शिक्षक, सुभाष नाईक सरांचा मुलगा, श्रावणी मामीचा पती, सानिया आणि साराचे पप्पा, आणि आमच्या माई वराडकरचा भाचा अशा अनेकाविध नात्यांनी... प्रत्येकांनी आपल्या जवळ मायेचा पाश ओढलेला हा माणूस ३० जून २०२४ ला एका क्षणात सगळ्यांना दूर करुन दूरच्या प्रवासाला निघून जातो.. आणि त्याच्या जाण्याच्या तीव्रतेने फक्त कट्टा, पेंडूर पंचक्रोशीच नाही तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिक्षणक्षेत्रातील संजय नाईक सर हे नाव माहित असलेला प्रत्येक जण आजही प्रत्येक क्षणी व्यथित होऊन जातो हे ओल्या डोळ्यांनी आज आम्ही सगळेच पाहतोय. त्यांच्या छायाचित्राला, त्यांच्या पुतळ्याला एका क्षणाचे जिवंतपण मिळो आणि हे सगळं खोट्ट ठरो असं प्रत्येक क्षणी वाटत जातं..

लौकीकार्थाने स्मरणलेख म्हणजे त्यांची कारकिर्द सांगणे.. पण इथं तर आठवणींचा पट उभा राहिला आहे. मुख्याध्यापक संजय नाईक ही साधारण दोन चार वर्षाची कारकीर्द संजूमामाने अर्थात संजय नाईक सरांनी एवढी मोठी करुन ठेवली होती की शब्दश: पोकळी म्हणजे काय याची संजय नाईक यांच्या अकाली जाण्याने जाणीव होतेय.

मुंबईच्या सोमय्या आणि रुईया सारख्या नामांकित महाविद्यालयात पदवी घेऊन पेंडूर गावी आलेले नाईक सर १९९३ पासून कट्टा येथील वराडकर हायस्कूल मध्ये गणित आणि विज्ञान चे शिक्षक म्हणून रुजू झाले विद्यार्थी दक्षेत मुलांना कठीण जाणारे हे विषय नाईक सरांनी हसत खेळत सोपे करून शिकविल्याने नाईक सर विद्यार्थी प्रिय शिक्षक बनले

आपलं वराडकर हायस्कूल आणि आपली मुले अव्वल राहीली पाहिजेत या ध्यासाने झटणारा हा हाडाचा शिक्षक होता. मुलांच्या प्रवेशोत्सवावेळी उत्साहात त्यांचे स्वागत करणारा आणि परीक्षेवेळी त्या प्रत्येक मुलाला आधार देणारा माणूस आज हरवलाय हे दुख फार मोठे आहे. मुलांसोबत लहान मुल होणारा शिक्षक आणि शिक्षकांसोबत त्यांना समजून घेणारा मोठा भाऊ होताना संजय नाईक सर कायमच चिरतरुण राहीले.

अलीकडच्या काळात सर्वच शिक्षण संस्थांना शासन वेतनेतर अनुदान देत नसल्याने सर्वांसमोर यक्षप्रश्न उभा ठाकला आहे अशा परिस्थितीत शिक्षण संस्थेस आर्थिक मदत व्हावी या हेतूने नाईक सरांनी मोरूची मावशी, मुंबईची माणसे, अपराध मीच केला यासारखी नाटके रंगमंचावर सादर करत निधी उभारून दिला. तर विद्यार्थ्यांची विज्ञान नाटिका राज्यस्तरापर्यंत नेली. संजय नाईक सरांची नाटकाची आवड गुरुदक्षिणा सभागृहासाठी बांधताना अपराध मीच केला या नाटकाच्या वेळी मी जवळून पाहिली होती. त्यांचा कॅप्टनच्या भुमिकेतील पांढऱ्या वर्दीतला करारी रुबाब आजही डोळ्यासमोरुन जात नाही. त्यानंतरही रंगभूमीसाठी कधी अभिनेता तर कधी शालेय नाटिकांसाठीचा दिग्दर्शकीय अनुभव सातत्याने संजय नाईक सरांनी जिवंत ठेवला.

आपली शाळा सुंदर आणि आदर्श शाळा कशी बनेल

याचा विचार करताना नाईक सरांनी विविध उपक्रम हाती घेतले. त्यात शाळेच्या भिंती कल्पकतेने रंगवीत सामाजिक आणि शैक्षणिक संदेश देण्याचे काम करतानाच भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रम, शिवकल्याण राजा या सारखे महानाट्य साकारून जिल्ह्यात शाळेचा नावलौकिक वाढविला.

आपल्या मुख्याध्यापक पदाच्या कार्यकाळात त्यांनी महानाट्यांचा लिलया थाट उभा केला. शिवकल्याण राजा, स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव अशा महानाट्यातून अवघी शाळा रंगमंचावर आणली.. आणि प्रेक्षक म्हणून पंचक्रोशी नाही तर अवघा जिल्हा आमंत्रित झाला.. शाळा ही प्रयोगभूमी घडवताना त्या सरस्वतीच्या प्रांगणाला विद्याभूमीचा संजय नाईक सरांनी चढवलेला विभूषीत साज हा अखंड स्मरणात राहील. यात भर म्हणून शेतीच्या बांधावर, वर्षा सहल, गुरू पौर्णिमा, यासारखे कार्यक्रम हाती घेतलेच शिवाय ब्युटी ऑन व्हील्सच्या माध्यमातून सायकलिंग सारखे आरोग्याच्या दृष्टीने उपक्रम ही राबविले. अशाप्रकारच्या सहशालेय उपक्रमाबरोबरच शाळेचा दहावी,बारावी परीक्षेचा निकाल सातत्याने शंभर टक्के लावतानाच शिष्यवृत्ती परीक्षा,स्पर्धा परीक्षा, क्रीडा स्पर्धा यामध्येही शाळेला प्रगतीपथावर नेण्यात महत्वाची भूमिका बजावली .

विज्ञान, गणित हे विषय शिकवण्याचे असतील पण पर्यावरण, कला आणि मराठी हे संजय नाईक सरांचे आपुलकीचे विषय होते. ओघवते वक्तृत्व आणि त्यांच्या जोडीला राजस व्यक्तीमत्व यामुळे नाईक सरांची छाप काही औरच होती. संजय नाईक सरांच्या यशस्वी मुख्याध्यापकपदाच्या कारकिर्दीमुळेच कट्ट्याच्या वराडकर हायस्कुलला मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा उपक्रमात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळाला होता हे नेहमी लक्षात राहील.

शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात काम करतानाच त्यांनी राजकीय क्षेत्रातही आपला दबदबा ठेवला होता खासदार नारायण राणे यांचें कट्टर समर्थक असणाऱ्या नाईक सरांनी पेंडूर गावचे सरपंच पद भूषविताना विविध विकास कामे करीत जनमानसात आपले स्थान पक्के केले शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी नाईक सर नेहमी आग्रही असायचे यातूनच ते शिक्षक भारती या संघटनेत सहभागी झाले व संघटनेत ते उपाध्यक्ष म्हणून कार्यरत राहिले तर सिंधुदुर्ग जिल्हा गणित अध्यापक संघाचे ते सदस्य होते

संजय नाईक यांनी स्वत:ला शिक्षकी पेशात बांधून न ठेवता शिक्षक हा समाजाला कसे घडवू शकतो हे दाखवून दिले. प्रयोगशील शेतकरी , दुग्ध क्रांतीसाठी सामाजिक एकोपा इथपासून ते अभिरुची पेंडूर सारखा सकस बौद्धिक उपक्रम आणि गावच्या राजकारणातला एक चेहरा सगळं संजय नाईक सरांनी करताना आपल्या शिक्षकी पेशाला कधीच अडसर बनू दिलं नाही.

संजय नाईक याचे शिक्षकपण अशा शब्दात लिहीणे अवघडच आहे. आयुष्यभर आपल्या वाटेत समाजासाठी आणि आपल्या विद्यार्थ्यांसाठी नक्षत्र पेरणारा हा सरस्वतीचा पुत्र आज आकाशगंगेत विराजमान झालाय. पण त्यांने दिलेले त्याचे अनंत काळासाठी नक्षत्रांचे देणे मात्र मागेच ठेवून..

***


'वंदना' वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



वराडकर बिल्डिंग मटेरिअल सप्लायर

ऋषिकेश वराडकर

मोबा. : ९१ ७८७५८१८२२८

चौके, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

मोबा. : +९१ ९४२२३८१०६९/+९१७६२०५५१६९१

ई-मेल : hrushi.varadkar1997@gmail.com

आमच्या येथे :-

चिरे * वाळू * खडी

योग्य दरात मिळेल.

# कट्टा पंचक्रोशीत घुमला छत्रपती शिवरायांचा जागर

**श्री. समीर अशोक चांदरकर**
कलाशिक्षक : वराडकर हायस्कूल कट्टा



**तत्कालिन मुख्याध्यापक स्व. संजय नाईक यांच्या नेतृत्वाखाली प्रशालेच्या अडीचशे विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिवचरित्रावर आधारित महानाट्य सादर केले.**

शालेय जीवनातील स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ! मग ते या स्नेहसंमेलनात विद्यार्थी गाणे सादर करतात एखादी नाटिका किंवा नृत्य पण अलीकडे सर्रास रेकॉर्ड डान्स पाहायला मिळतात त्यातही आजच्या तरुण पिढीला डीजेवर थिरकणारी नृत्य जास्त आवडतात पण आमच्या वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टा येथे गेली अनेक वर्ष एखादी थीम घेऊन स्नेहसंमेलन साजरे केले जाते त्यातही वैयक्तिक रेकॉर्ड डान्स न ठेवता जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कसं सहभागी करून घेता येईल याचा शिक्षक विचार करत असतात

गेली दोन वर्ष कोरोनामुळे विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनात सहभागी होता आले नाही त्यामुळे यावर्षी काहीतरी वेगळे करायचं या हेतूने साडेतीनशे वर्षे होऊनही आपल्या मनावर राज्य करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास महानाट्याच्या रूपाने प्रेक्षकांसमोर मांडण्याचा विचार समोर आला प्रशालेचे तत्कालीन मुख्याध्यापक श्री संजय नाईक सर यांनी यास मान्यता दिली परीक्षांचा कालावधी, इतर सहशालेय उपक्रम, क्रीडा स्पर्धा यामुळे महानाट्य साकारण्यासाठी मिळणारा कालावधी अत्यंत कमी म्हणजे जवळपास आठ ते दहा दिवसांचा होता. आव्हान खूप मोठे होते जवळपास २५० बालकलाकार या महानाट्य मध्ये सहभागी होणार होते यातील बऱ्याचश्या बाल कलाकारांनी कधीही रंगमंचावर येण्याचे धारिष्ट दाखवलेले नव्हतं

कालावधी कमी असला तरी छत्रपती शिवरायांविषयी असलेल्या प्रेम मात्र कुठल्याही त्रास होत मोजता येणार नव्हते प्रशालेचे तत्कालीन मुख्याध्यापक श्री संजय नाईक आणि कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर व सर्व संचालक मंडळ यांच्या पाठिंब्यामुळे हे शिवधनुष्य

पेलण्याचे धाडस सर्व शिक्षक वृंदाने दाखवले

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे जाणता राजा हे महानाट्य समोर होते याच धर्तीवर बालकलाकारांच्या माध्यमातून पुन्हा एकदा शिवसृष्टी निर्माण करण्याचा निर्धार झाला संहिता महत्त्वाची होती त्याचबरोबर प्रत्यक्ष माइकचा वापर करणे शक्य नव्हतं त्यामुळे संपूर्ण महानाट्याचा ट्रॅक आणि सोबत अलीकडेच महाराजांवर आधारित चित्रपटातून निवडलेली गाणी त्यांचा वापर करत तीन तासांचा कार्यक्रम रेकॉर्ड करण्यात आला या महानाट्याच्या दिग्दर्शनाची जबाबदारी कलाशिक्षक समीर चांदरकर व सहकारी शिक्षक यांनी पार पाडली

केवळ नृत्यावर जाऊन न देता महाराजांनी आपल्याला घालून दिलेले आदर्श त्यांचे विचार बुद्धीचातुर्य, आपल्या रयतेविषयी असणारी तळमळ, स्वराज्याचे प्रेरणा आजच्या तरुण पिढीसमोरील यावी हाही या मागचा उद्देश होता पात्रांची निवड झाली आणि महाराजांच्या जीवनावरील एक एक प्रसंग साकारण्याची जबाबदारी सर्व शिक्षकांनी स्वीकारली महाराजांचा आणि मावळ्यांचा अभिनय करण्यासाठी बरेच विद्यार्थी समोर आले खरी कसरत होती मुघल, पठाण, आदिलशहाचे सैन्य, औरंगजेब,अफजलखान ही पात्र निवडण्याची! छत्रपती शिवाजी महाराजांविरुद्ध लढण्यापेक्षा त्यांच्यासोबत मावळे म्हणून लढण्यास मुले इच्छुक होती. चार ते पाच दिवस थोडा फार सराव करत विद्यार्थ्यांनी आपल्या भूमिका व प्रवेश जाणून घेतले. नृत्य करणाऱ्या मुलींनी प्रचंड मेहनत घेत व्यवसायिक कलाकारांच्या तोडीचे नृत्य सादर केले यासाठी सहकार्य लाभले त्या नृत्य दिग्दर्शक अरविंद वराडकर यांचे! जवळपास ५० फूट लांबीच्या रंगमचावर या महानाट्या ला साजेसे नेपथ्य साकारणे तेही कमी खर्चात हे खूप मोठे आव्हान होते

स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम असल्यामुळे एवढ्या लांबीचा स्टेज उपलब्ध होत नव्हता यासाठी श्री नाईक सर यांनी व क्रीडा शिक्षक संजय पेंडूरकर सर यांनी प्रचंड मेहनत घेतली शिवप्रतिष्ठान पेंडूर व बाळा वराडकर यांच्या माध्यमातून स्टेज उपलब्ध झाला महानाट्याला शोभेल असं जवळपास १२ फूट उंच व पन्नास फूट लांब किल्ला आणि नेपथ्या साठी बनवणे आवश्यक होते त्यासाठी कलाशिक्षक समिर चांदरकर, अनिल मेस्त्री, रामदास चांदरकर, राहुल जाधव, शिंदे, बंडू सावंत यांचे सहकार्य लाभले

या महानाट्यासाठी साउंड सिस्टिम, स्टेज व्यवस्था, विद्यार्थ्यांचे पोषाख हे फार खर्चिक बाब होती परंतु कट्टा पंचक्रोशीतील प्रवीण मिठबावकर, प्रदीप मिठबावकर तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष अनिल फणसेकर व सर्व पदाधिकारी व इतर अनेक दात्यांनी मदतीचा हात पुढे केला आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिला बालनाट्याचा प्रयोग हाऊसफुल्ल झाला. २५० बालकलाकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील साकारलेले प्रसंग, बहारदार नृत्य, सोबत घोडे, बैलगाडी यांच्या प्रत्यक्ष वापर या सर्वांमुळे महानाट्य विस्मरणीय ठरले जवळपास पंधराशे लोकांनी येणारे नाट्य प्रयोगाचा आनंद घेतला सोशल मीडियावर या नाट्यप्रयोगातील काही प्रवेश व्हायरल झाले

सर्व शिक्षकांचे अथक प्रयत्न आणि त्याला विद्यार्थ्यांनी दिलेली मेहनतीची जोड यामुळे अतिशय कमी कालावधीत हा भव्य दिव्य नाट्यप्रयोग यशस्वी झाला कट्ट्यासारख्या ग्रामीण भागातही विद्यार्थ्यांमध्ये असणारी प्रचंड प्रतिभा यांना नाट्य प्रयोगाच्या माध्यमातून समोर आली.

***

'वंदना' वार्षिक अंकास
हार्दिक शुभेच्छा..!




श्री स्वामी समर्थ
पॅकेजिंग
कुंभारमाठ, गवळीवाडा, मालवण
सर्व प्रकारचे कॉरुगेटेड (पुठ्ठा)
बॉक्स तयार करून मिळतील.
संजय नरे ९४२१२६८५७७
अध्यक्ष : सिंधुदुर्ग जिल्हा आंबा व्यावसायिक
सहकारी संघ.

# नांदोसचा भुईकोट किल्ला !

**कु. इशा सचिन गावडे**
बारावी वाणिज्य




**वराडकर हायस्कूल कट्टाच्या विद्यार्थ्यांनी नांदोस गढीला भेट दिली. त्याचे छायाचित्र.**

नमस्कार ! शीर्षक वाचून तुम्हाला प्रश्न पडला ना ? हो, खरं आहे.... नांदोस गावामध्ये सुद्धा किल्ला होता. त्याला भुईकोट किल्ला असे म्हटले जायचे. आज तिथे किल्ला अस्तित्वात नसला तरी त्याचे काही अवशेष आपल्याला पाहायला मिळतात नांदोसचे ग्रामस्थ आजही व्यवस्थितरित्या त्याची देखभाल करतात. उपलब्ध माहितीनुसार या किल्ल्याचे बांधकाम सन १८०५ मध्ये केले गेल्याची माहिती १५ फेब्रुवारी १८०७ रोजीच्या पत्रात मिळते.

नांदोस किल्ल्याचा इतिहास हा रंजक आहे स्वतंत्र राज्याप्रमाणे आपलाही प्रदेश असावा अशी इच्छा सावंतवाडीच्या भोसल्यांना झाल्यानंतर त्यांची ही इच्छा पेशव्यांचे सरदार महादेव शिंदे यांनी पूर्ण केली. त्यांनी मोगलांकडून ११ मे १७८५ रोजी त्यांनी हा प्रदेश (मौचेल) सावंतकराना मिळवून दिला याची माहिती सावंतकरांनी आपले पूर्वीचे धनी करवीरकरांना दिले त्यातच सावंतांनी नोव्हेंबर १७८६ मध्ये करवीरकरांनी मालवण मार्गावरील कट्ट्याजवळच वेताळगड बांधण्यात आला सावंत यांची आगळीक वाढत चालल्याचे दिसताच १७८७ साली करवीरच्या फौजांनी आपल्या छत्रपतींच्या नेतृत्वाखाली घोटणे घाटात खाली उतरून सावंतांच्या मूलखात धुमाकूळ घातला आणि वरचा मुलुख काबीज केला यावेळी करवीरकरांच्या फौजा मालवण येथून सावंतवाडीवर स्वारीस निघाल्या असता वाटेत नांदोस येथे तळ ठोकला यावेळी नांदोस येथे सावंतांचा पराभव केल्यावर लवकरच करवीरकरांनी सावंत यांनी बांधलेला वेताळगड काबीज केला काही वर्षानंतर सन १८०५ मध्ये सावंतवाडी अंतर्गत कलहात गुंतले असता फोंडसावंतांच्या विनंतीवरून करवीर

छत्रपती हे करवीर येथून १५ ऑगस्ट १८०५ रोजी सावंतांच्या मुलखातून चाल करीत निघाले असता त्यांचे काही किल्ले घेत छत्रपतींनी नांदोस येथे तळ दिला आणि त्याच वेळी नांदोस येथे किल्ला बांधला त्यास मजबुती यावी म्हणून किल्ल्याच्या चहूबाजूस खंदक खणले या नवीन किल्ल्याचा त्रास अर्थात सावंतांना होणार होता सावंतांना नांदोसचे अस्तित्व खटकू लागल्याने लक्ष्मीबाई सावंतांनी आपले सैन्य नांदोस वर पाठवले आणि नांदोस येथे लढाई झाली या लढाईत सावंतांचा पराभव झाल्याचे पाहून लक्ष्मीबाई यांचा भाऊ रामचंद्र खानविलकर यांनी फौजेची जमवाजमव करून चंद्रोबा सुभेदार तसेच इतर सरदारांना घेऊन लढाईची तयारी दाखवली दरम्यानच्या काळात करवीरचे छत्रपती आपल्या प्रमुख सैन्यासह कोल्हापुरात निघून गेल्याने सावंतकरांनी खानविलकरांच्या नेतृत्वाखाली नांदोस वर चाल केली या लढाईत करवीरकरांचे अडीचशे लोक ठार झाल्याने करवीरकरांना माघार घ्यावी लागली आणि हा किल्ला सावंतकरांच्या ताब्यात आला नांदोस हातचा गेल्याने नांदोस ताब्यात घेण्यासाठी करवीरकर हे नांदोसवर चाल करणार हे सावंतकर जाणून होते अशावेळी त्यांना रोखणे कठीण होईल म्हणून खानविलकरांनी नांदोस किल्ला पाडण्यास सुरुवात केली जेणेकरून करवीर सैन्याचा तळ नांदोस येथे राहू नये.

याच दरम्यान नांदोसचा किल्ला हासिल करण्यासाठी करवीरकर मालवण येथून निघाले मात्र नांदोसकरांनी घेतलेल्या किल्ल्याचे पुढे काय झाले करवीरकरांनी पुन्हा याची दुरुस्ती केली का अथवा तो असाच पडला याविषयी इतिहास गप्प आहे हे खरे असले तरी नांदोस हे मालवण मार्गावरील प्रमुख गावांपैकी एक असल्याने तिथला गड करवीरकरांनी पड ठेवल्याची शक्यता वाटत नाही त्यांनी नांदोस किल्ल्याची पुन्हा दुरुस्ती केली असणार याचे कारण म्हणजे सन १८६२ मध्ये देखील या किल्ल्याची तटबंदी व खंदक चांगल्यापैकी सुस्थितीत होता असा ह्या किल्ल्याचा इतिहास सांगितला जातो असे असले तरी या किल्ल्याबाबत फारशी कोणाला माहिती नाही.

***

‘वंदना’ वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



भ. ता. चव्हाण म. मा. विद्यालय
चौके, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग

* शुभेच्छुक *
मुख्याध्यापक, शिक्षक
व शिक्षकेतर कर्मचारी.

‘वंदना’ वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



आशिष शंकरदास



# जादूची फुले

**मानसी संतोष गरुड**
इयत्ता दहावी

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. रामपूर नावाचं एक गाव होतं. त्या गावात नंदन नावाचा एक शेतकरी राहत होता. नंदन गावातल्या लोकांशी फार चांगल्या पद्धतीने वागायचा. नंदनला मूलबाळं नव्हतं. नंदन व त्याची बायको ही दोघेच राहत असत. नंदा हा शेतात भाज्या पिकवायचा आणि त्या भाज्या बाजारात जाऊन विकायचा. त्यावरच त्याचं घर चालायचं. नंदाची पत्नी राधा ही दिसायला खूप सुंदर होती. दर रविवारी रामपूरचा आठवडा बाजार भरायचा. त्या बाजारात नंदनची पत्नी राधा ही बाजारात जायची व आपल्या नवऱ्यासोबत भाजी विकायला मदत करायची. असेच एक दिवस राधा ही बाजारात जात असताना तिला वाटेत एक शेत दिसलं. तिने त्या शेतात डोकावून पाहिलं असता त्या शेतात विविध रंगांची फुलं फुललेली होती. ती फुले तिला फार आवडली म्हणून ती त्या बागेत गेली. तेव्हा तिला त्या बागेत सोनेरी रंगाची फुले दिसून आली. त्या फुलांना पाहून तिला नवल वाटले. तिने त्या बागेतील एक फुल तोडले आणि ती बाजारात जाण्यासाठी निघाली. खरं तर ती ज्या बागेत फूल पाहण्यासाठी गेली होती त्या बागेत एक चेटकीन राहत होती. ती बाग त्या चेटकिणीची होती. ती चेटकीन रोज रात्री आपल्या बागेत फिरायला यायची. नेहमीप्रमाणे ती चेटकीन आपल्या बागेत आली आणि ती बागेतील फुले पाहू लागली. फुले पाहता पाहता तिचं लक्ष त्या फूल नसलेल्या झाडांवर गेले आणि ती विचार करू लागली. या बागेतील फूल कोणी तोडले असेल? विचार करीत करीत ती बागेतून निघून गेली.

इकडे राधा घरी जाऊन नंदनला कधी एकदा ते फुल दाखवते असे तिला झाले होते. राधा लगबगीने नंदनला म्हणाली, 'मी आज बाजारात जाताना एक बाग पाहिली त्या बागेत विविध रंगांची फुले होतीच; पण त्या बागेत सोन्याची फुले देखील होती. नंदन तिच्या बोलण्यावर हसू लागला आणि म्हणाला की, असं होऊ शकत नाही त्याचा या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. म्हणून राधाने बागेतून तोडलेले ते सोन्याचे फुल ती नंदनला दाखवते. तेव्हा नंदन सुद्धा आश्चर्यचकित होतो. तो राधाला म्हणतो की, 'तू मला त्या बागेत घेऊन जा.' दुसऱ्या दिवशी सकाळी ते दोघे त्या बागेत जातात. नंदन ते सगळं पाहताच क्षणी थक्क होऊन जातो. त्याला वाटतं की, आपण स्वप्न तर पाहत नाही ना? असा विचार करीत तो त्या बागेत जाऊन त्यातील काही फुले तोडतो. थोड्या वेळाने ती दोघे घरी जातात. असेच दहा-बारा दिवस सतत चालत असते. काही दिवस चेटकीन त्याच्या बागेत नसल्यामुळे तिला आपल्या बागेतील फुले कोण चोरून घेऊन जातोय हे कळत नसते मात्र चेटकीन जेव्हा आपल्या बागेत येते आणि बघते तेव्हा तिच्या बागेतील सोन्याची फुले गायब झाली आहेत. म्हणून ती एक युक्ती करते. नेहमी रात्री येणारी चेटकीन आज आपल्या शेतात सकाळीच आली होती आणि ती एका झाडावर लपून बसली होती.



नेहमीप्रमाणे नंदन आणि त्याची पत्नी राधा ही दोघेही फुले तोडायला येतात. ते दोघेही फुले तोडतात हे पाहून ती चेटकीन झाडावरून खाली उतरते आणि त्यांच्या जवळ जाते. ती चेटकीन त्यांना विचारते की, 'तुम्ही माझ्या बागेतील फुले का चोरतात.' त्या

चेटकिणीला पाहून ते घाबरतात... त्यांचे हात-पाय खूप थरथरायला लागतात. हे बघून चेटकिनिला दया येते. ती त्यांना फुल तोडल्याबाबत विचारते. त्यावर नंदन म्हणतो की, 'आम्ही खूप गरीब आहोत. आमची शेती आहे. आम्ही त्या शेतात भाजी पिकवतो. परंतु आम्हाला त्यादिवशी फुलांची बाग दिसली. या बागेतील फुले माझ्या बायकोला खूप आवडली म्हणून मी रोज इथे येऊन माझ्या बायकोसाठी ही फुले घेऊन जातो. त्यावर ती चेटकीन म्हणाली, कधीही कोणाची चोरी करू नये, असे म्हणत ती चेटकीन नंदनला एक जादुई फुल देते आणि म्हणते की, 'तू खरं खरं बोललास म्हणून तुला माझ्याकडून एक बक्षीस. असे म्हणून ती गायब होते. नंदन हा घरी जातो. आपल्या घरी गेल्यावर नंदनला एक आश्चर्यचकित होण्यासारखी एक गोष्ट दिसते की, त्यांच्या छोट्या झोपडीचा मोठा बंगला झालेला असतो. नंदन आणि त्याची पत्नी राधा हे दोघेही त्या बंगल्यात सुखासमाधानाने राहतात.

***


With Best
Compliments From !



HEMWAY
CONSULTANCY
*Hemway the Goldern Path*
Associate Partner : Hem Securities
1) IPO
2) Equity
3) Future & Option
4) Currency
5) Commodity
6) Research
7) SME listing
8) Banking Finance
Mob. : 8383923032, 9769279798
E-mail : hemawaypath2021@gmail.com


## परी



एक होती परी
परी होती खरी
नाव तिचे मॅरी
आई सांगायची स्टोरी

एकदा काय झाले
पतंग झाडावर अडकले
बाळ रडू लागले
परीने पतंग काढले

मधुर अर्जुन पेंडूरकर
इयत्ता ५ वी

## बाबा

फेब्रुवारीला देवाने माझ्या आयुष्यात अंधार पेरला,
बाबा. या अंधारात तुम्ही मला एकटेच सोडून गेलात

आयुष्यात बाबांची किती गरज असते ते फक्त
एक मुलगीच सांगू शकते
स्वप्नातही ती आपल्या बाबांनाच पहात असते

प्रत्येक क्षणाला मुलीला गरज असते बाबांची,
बाबा... का सोडून गेलात मला
गरज आहे तुमची

तुमच्या नावामुळे ओळक आहे माझी
तुमच्याशिवाय अधुरी आहे मी
बाबा... एकदा तरी विचार करा ना माझा
बोट धरून चलणारी तुमची मुलगी
तुमच्या शिवाय जगू शकेल का बाबा..

माझी प्रत्येक हौस-मौज करायचे तुम्ही
कधी नाराज असले की हसवायचे तुम्ही

मनापासून हाक देते तुम्हांला आता,
माझ्यासाठी तरी परत या ना बाबा..

दामिनी दिलीप वायंगणकर
इयत्ता : १२ वी (वाणिज्य)

# गणितोत्सव.... शाळांसाठी एक प्रेरणास्त्रोत

**श्री. प्रकाश विठोबा कानूरकर** सहाय्यक शिक्षक
वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टा

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात गणित हा महत्त्वाचा भाग मानला गेला आहे. गणिताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे तर्कशक्ती, विश्लेषणात्मक विचार आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढवता येते. आमच्या वराडकर हायस्कूल आणि कट्टा या प्रशालेतही या संधीचा फायदा घेत गणित उत्सव आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण करणे आणि त्यांच्यातील गणिताची भीती कमी करण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येकासाठी गणित या संकल्पनेवर आधारित गणितोत्सव साजरा केला गेला. गेली काही वर्षे गणितोत्सव हा उपक्रम विद्यार्थ्यांचे गणित विषयाचे ज्ञान वाढवून त्यांना गणितातील विविध पैलूंची ओळख करून देण्यासाठी व्हावी लाभदायक असा ठरला आहे. म्हणूनच गणितोत्सव हा उपक्रम इतर शाळेसाठी आदर्श आणि प्रेरणादायी ठरला आहे.



**वराडकर हायस्कूलमध्ये गणितोत्सव २०२३ साजरा करण्यात आला. त्यावेळी विद्यार्थ्यांना पारितोषिके देताना मान्यवर.**

या कार्यक्रमाचे स्वरूप हे अनोखे असेच होते. आठवड्याचे सातही दिवस गणिताचे उपक्रम या गणितोत्सवात राबविले जातात. पहिल्या दिवशी Maths table day यामध्ये विद्यार्थ्यांना गणितातील पाढे यांचे महत्त्व शिकवण त्यांच्या गणितातील पायाभरणीला बळकटी देता येईल. तर दुसऱ्या दिवशी Number pattern Day मध्ये संख्या पद्धतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गणितीय विचारांची क्षमता वाढवता येईल. तर तिसऱ्या दिवशी Prime numbers day मध्ये मूळ संख्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अंकगणिताचे विविध उपयोग शिकवता येतील. चौथ्या दिवशी Perfect squares day मध्ये पूर्ण वर्ग संख्यांचे वैशिष्ट्य आणि त्यांचा उपयोग शिकून गणितातील रुची वाढवता येईल. पाचव्या दिवशी Ramanujan puzzles day मध्ये श्रीनिवास रामानुजन यांच्या विविध कोड्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यात क्षमतेत वाढ करता येईल. सहाव्या दिवशी Pythagoras triple day पायथागोरसच्या त्रिकोनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्रिकोण निर्मितीची ओळख करून देता येईल. सातव्या दिवशी Practical maths in daily life day मध्ये गणिताच्या दैनंदिन जीवनातील उपयोग शिकवण विद्यार्थ्यांना वि द्या र्थ्यां च्या गणिताच्या ज्ञानाचा व्यवहारिक उपयोग करता येईल.

गणितोत्सवाच्या निमित्ताने पुरातन आणि नोटांचे प्रदर्शन आयोजित करून विद्यार्थ्यांना इतिहास आणि गणित यांची सांगड कशी घालावी हे शिकवता येईल या प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांना शैक्षणिक अनुभवांना समृद्ध करतील यात कोणताही संदेह नाही

गणितोत्सवा सारखे उपक्रम इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरावा आपल्या शाळेतही असे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या गणितातील गोडी वाढवता येईल, शिक्षक पालक आणि शाळा प्रशासन यांनी एकत्र येऊन अशा कार्यक्रमांचे आयोजन करावे यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात नव्या उंचीचे योगदान देता येईल आणि गणिताचा आनंद सर्वांना अनुभवता येईल. गणिताचा आनंद साजरा करून आपल्या विद्यार्थ्यांच्या भविष्याची गणितीय पाया भक्कम करता येईल.

***

## गावाक जावचा रवला..

कोरोनाचा वादळ ह्या
असा काय हो फिरला ।।२।।
यंदाच्या मे महिन्यात
माझा गावाक जावचा रवला
माझो, गाव आणि माझ्या कोकणात
एवढी काय पावर-असा की आम्ही
एका रात्री अवघी मुंबई खाली करू शकतो
काय सांगू मित्रा तुला
किती सुंदर माझो गाव ।।२।।
म्हणतात पूर्व काशी
त्याचा कोकण आसा नाव
निळेशार समुद्र आणि थंडगार हवा
यंदाच्या मे महिन्यात गावाक जाऊचा रवला भावा.!

स्वाती प्रकाश वराडकर
इयत्ता : १० वी (ब)

## आम्ही कबड्डी वेडे...!



कोणाला मदिरेची नशा आहे तर...
कोणाला प्रेमाची नशा आहे
पण आम्ही कबड्डी वेडे आहोत
आम्हाला फक्त कबड्डीची नशा आहे
कोणाला पदाचा गर्व आहे तर
कोणाला श्रीमंतीचा गर्व आहे
पण आम्ही कबड्डी वेडे आहोत
आम्हाला फक्त त्या मैदानावरच्या
छोट्या-मोठ्या ट्रॉफ्यांचा गर्व आहे
प्रत्येक श्वास, ध्यास आणि प्रवास
फक्त आणि फक्त कबड्डीसाठी
असा एकही दिवस नाही
जो कबड्डी खेळल्याशिवाय जात नाही
म्हणूनच तर आम्ही कबड्डी वेडे आहोत
आम्ही कबड्डी वेडे होय
आम्ही कबड्डी वेडे आहोत

रोशनी त्रिगुण कदम
इयत्ता : ८ वी (ब)

## शिमगो

गाव म्हटलो काय शिमगो आठवता
मुंबइचो चाकरमानी गावाक धाव घेता...
आतुरतेत वाट बगतत कधी येता होळी
जेवताना गोड म्हणाण आवडीण खातत पुरणपोळी
शबय-शबय म्हणत दारात येता संकासुर
लहान पोरांका घाबरवत पळत सुटता गावातसून
शिमगो म्हटलो काय खळ्यान
अवतरता स्वर्गातल्या देवांचे खेळ
पोरान थोराच्या लक्षात रवना
असो ह्यो शिमग्याचो मेळ

वैभवी सुनिल बागवे
इयत्ता : १२ वी (वाणिज्य)

## नदी

नदी सागरा मिळता पुन्हा येईना बाहेर
अशी शाहाण्यांची म्हणत नाही नदीला माहेर...
काय रे बाप्पांनो तुम्ही आंधळ्यांचे चेले
नदी माहेरला जाते, म्हणूनच जग चाले...
सारे जीवन नदीचे घेतो पोटात सागर
तरी तिला आठवतो जन्म दिलेला डोंगर...
नदी सागरा मिळते रूप वाफेचे घेऊन
नदी तरंगत जाते पंख वाऱ्याचे लावून...
पुन्हा होऊनी लेकरू नदी वाजवते वाळा
पुन्हा फुटतो डोंगर आणि येतो पावसाळा...

जान्हवी संदीप देसाई
इयत्ता : ८ वी (अ)

# एक निष्ठावान सेवाव्रत्ती.... श्रीमती मालवदे मॅडम

**वासंती किणीकर** सेवानिवृत्त मुख्याध्यापक
वराडकर हायस्कुल आणि ज्युनिअर कॉलेज, कट्टा



**प्रशालेच्या सहाय्यक शिक्षिका श्रीमती ज्योती मालवदे यांचा सेवानिवृत्तीपर सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. अजयराज वराडकर यांच्यासोबत अन्य मान्यवर.**

वराडकर हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय कट्टाच्या सहाय्यक शिक्षिका श्रीमती ज्योती नंदकिशोर मालवदे या शिक्षकी पेशातून ३१ डिसेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्या. वराडकर हायस्कुलची माजी विद्यार्थिनी ते सहाय्यक शिक्षिका अशी वाटचाल करणाऱ्या श्रीमती मालवदे मॅडम यांच्या कार्याचा परिचय करून देणारा लेख !

सेवानिवृत्ती... खरंतर प्रत्येकाच्या जीवनात येणारी ही गोष्ट काही काही वेळा नकोशी वाटत असली तरी ती आपल्या जीवनात पर्याप्त बनून राहते तसं पहायला गेले तर निवृत्तीची एक अनामिक हुरहुर ही प्रत्येकाला असतेच पण तरीही त्यात एक समाधान असते आतापर्यंत इमाने इतबारे केलेली नोकरी आणि त्यातही शिक्षक पेशा असेल तर तो अधिक समाधान देणारा असतो लहान लहान मुलांच्या सहवासात वैयक्तिक सुख दुःख बाजूला ठेवायला लावणारा ! आनंदी फुलपाखरासारखी स्वच्छंदी होऊन हरहुन्नरी मुले शिक्षकांसाठी वाट पाहतात त्यांचे सारे म्हणणे उमलत्या फुलांसारखे ऐकतात, प्रेम देतात, आदर देतात, एकदा शिकवणे म्हणजे दोनदा शिकणे असे म्हणतात त्याचेही समाधान देणारा ! ह्या साऱ्याच बाबी एका हाडाच्या शिक्षकाला समाधान, आनंद देणाऱ्या असतात जीवनाची कृतार्थता देणाऱ्या!

श्रीमती ज्योती मालवदे या पूर्वाश्रमीच्या कुमारी अरुणा चव्हाण. माझी विद्यार्थिनी! आता शिक्षकी पेशातील एक सहकारी शिक्षिका. मी माझ्या बाई श्रीमती वझे मॅडम, सौ झारापकर मॅडम आणि मालवदे मॅडम अशा तीन पिढया आम्ही एकत्र कार्यरत होतो वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टा या प्रशालेत अशा माजी विद्यार्थ्यांच्या दोन-तीन पिढ्या एकत्र कार्यरत असण्याचे भाग्य आम्हाला लाभले हे देखील आयुष्यातील एक पूर्व संचितच होय.

मालवदे मॅडम प्रामुख्याने पाचवी ते सातवी पर्यंत मराठी, इतिहास, भूगोल, कार्यानुभव इत्यादी विषयांचे अध्यापन करीत आमच्याच हायस्कूलमध्ये शिकून तेथेच अध्यापन करण्याचे भाग्य त्यांनाही मिळाले त्यामुळे शाळा,

घर, प्रपंच यामध्ये मॅडम व्यग्र असत त्यांची मुलेही या शाळेत शिकली त्यामुळे मॅडमांचे शाळेशी अधिक ऋणानुबंध निर्माण झाले इथेच जन्म, इथेच शिक्षण, इथेच अर्थाजन असे सदभाग्य त्यांना लाभले

एक सहकारी शिक्षिका म्हणून मालवदे मॅडम यांचे मला खूप चांगले अनुभव आले स्वतःमध्ये मिळून मिसळून राहणाऱ्या, दुसऱ्यांचे म्हणणे ऐकून घेणे या त्यांच्या चांगल्या सवयी आहेत काही गोष्टी पटल्या नाहीत तर त्यांची नाराजी कळते पण दुराग्रहाने, हट्टीपणाने कधी वागत नाहीत आमच्या शिक्षकांच्या सोसायटीच्या वार्षिक सभेला तर आम्ही ७० /८० लोकांसाठी/ सभासदांसाठी शाळेतच भोजन व्यवस्था ठेवत होतो त्यात मसूरकर मॅडम, मालवदे मॅडम या सर्व कामात मदत करीत. स्काऊट गाईडची प्रशिक्षण वर्ग चालवणे, खरी कमाई, स्वच्छता मोहीम, शालेय स्नेहसंमेलने, विविध शिबीर या उपक्रमात त्या मोलाचे सहकार्य करीत. दिलेले काम चोख बजावणे हा त्यांचा स्वभाव आहे

श्वास जर आपल्याला जिवंत ठेवत असेल तर.... विश्वास हा नात्यांना टिकवून ठेवतो.असा विश्वास संपादन करणे ही एक दोन वर्षाची गोष्ट नसते ती कायमची वृत्ती असते मालवदे मॅडम यांनी ती संपादन केली आहे.

या प्रशाळेची मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना त्यांच्यातील सदगुणांचा मला प्रत्यय आला कधी ज्यादा कामे पडली तर विना तक्रार त्या करीत असत विशेषतः नवोदय विद्यालयाचे प्रवेश फॉर्म श्री. प्रकाश कदम आणि मालवदे मॅडम यांच्याकडेच भरावयाचे. दिलेल्या मुदतीत, दिलेले काम पूर्ण होई नवोदय चे वर्ग घेणे हेही तेवढेच महत्त्वाचे होते

पोषण आहार ही शासकीय मध्यान भोजन योजना म्हणजे कदम सर आणि मालवदे बाई यांच्यावरच भिस्त असे पुढे सहावी सातवी आठवीपर्यंतच्या या योजना अंतर्गत मिळवून सुमारे ४५० विद्यार्थी विद्यार्थिनी त्यांचे लाभार्थी होते सर्व वर्गशिक्षक या कामी जातीने लक्ष देत आमचे कॅन्टींग चालवणारे श्री अण्णा कुबल यांनी तर प्रचंड सहकार्य केले आहे पोषण आहार अंतर्गत या साऱ्यांनी एकत्रितपणे फार छान काम केले आहे म्हणूनच मुख्याध्यापकपदावर काम करताना निश्चिंत असायचे या योजनेसंदर्भात अनेक वेळा अधिकारी वर्ग माहिती घेणे, तपासणी करणे, आहार चाचणी घेणे, आहार पुरवठा, खर्च, शिल्लक पुरवठा यांची तपासणी यासाठी येत असत या सर्वांना माहितीचा तपशील वेळेत आणि समाधानकारकरीत्या देण्याचे मोठे काम श्री कदम सर मालवदे मॅडम आणि वर्गशिक्षक यांनी चोख पणे बजावले आहे

श्रीमती मालवदे मॅडमांची आणखी एक ओळख म्हणजे स्काऊट /गाईड शिक्षिका म्हणून आहे गाईड पथके चालवण्यासाठी प्राथमिक, प्रगत प्रशिक्षणे तर मॅडमनी उत्साहाने घेतली पथके सुरू केली स्काऊट गाईड कॅम्पना मॅडम सर्वांना उत्तम प्रकारे सहकार्य करीत. त्या कोणत्याही कामांना सदैव तयार असत विशेष म्हणजे स्काऊट गाईड विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी परीक्षेला बसवण्याची वेळ आली तेव्हा शिक्षकांचे हिमालय वूड बॅच प्रशिक्षण असणे गरजेचे होते श्री कदम सरांनी ते केले पण त्यावेळी मालवदे मॅडम यांची तब्येत ठीक नव्हती त्यामुळे प्रशिक्षणात जाणे त्यांना त्रासदायक होते हे प्रशिक्षणन झाल्यास विद्यार्थिनींना राष्ट्रीय पुरस्कारापासून वंचित रहावे लागले असते म्हणून बाईंना हे पटवून दिल्यानंतर बाईंनी तो त्रासही सहन करीत प्रशिक्षण पूर्ण केले त्यामुळे सुमारे शंभर विद्यार्थ्यांनी या पुरस्काराच्या पूर्वतयारीसाठी पात्र ठरल्या त्यांची याबाबतची सर्व तयारी श्री कदम सर व मालवदे बाईंनी करून घेतली

एकूणच विद्यार्थीदशा काय किंवा शिक्षकीपेक्षा काय जी जी जबाबदारी पार पाडायची त्यात अज्ञाधारकपणा, प्रामाणिकपणा, कामाचे सातत्य या बाबींची गरज असते मॅडम या सर्वात अग्रेसर असतात विद्यार्थ्यांचे तीन शत्रू मानतात दुर्लक्ष, घाई आणि स्तुती मालवदे या तीनही शत्रूंपासून दूर राहतात म्हणूनच, लेखाची समाप्ती करताना खालील ओळी उदयुक्त करण्याचा मोह आवरता येत नाही

मालवदे मॅडम...
तुमच्यातील सामान्यपणा
साधेपणा आणि प्रामाणिकपणा,
सामंजस्यपणा आणि आज्ञाधारकपणा
तुम्हाला यश देणारा आणि समाधान देणारा
भावी आयुष्यासाठी तुम्हाला शुभेच्छा!

***

# आई बाबांची किंमत

**कु. तनिषा गावडे**
इयता दहावी

एक विजयपूर नावाचे गाव होते. त्या गावात एक गरीब कुटुंब राहत होते. त्या कुटुंबात मनोज नावाचा मुलगा व त्यांचे आई-बाबा असे तिघेजण राहत होते. मनोजचे आई-बाबा मोलमजुरी करून त्याला शिकवायचं. मनोज हा अभ्यासात खूप हुशार होता. काही दिवसांनी मनोजचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांच्या आई-बाबांना त्याला त्याच्या पुढील शिक्षणासाठी परदेशात पाठवायचे ठरविले. त्यासाठी त्यांनी दिवस रात्र मेहनत करून पैसे जमविले. ठरल्याप्रमाणे मनोज परदेशात जाण्याची तयारी सुरू केली. त्याने बॅग वगैरे भरली आणि शेवटी तेथे दिवस उजाडला. ज्या दिवशी मनोज परदेशात जाणार होता. खरं शिक्षणासाठी परदेशात जायला मिळणार म्हणून मनोज खुश होता. त्याने देवाला नमस्कार केला आणि तो आई बाबांचे आशीर्वाद घ्यायला गेला. तेव्हा त्याचे बाब त्याला म्हणाले , 'बाळा, शीक लय मोठा हो बर ! पण आम्हाला नग इसरू एवढा बोलून ते रडायला लागले. मनोजने कसंतरी डोळ्यातलं पाणी आवरत मनोजच्याही डोळ्यात पाणी आले.

मनोजने आपल्या आई बाबांचा निरोप घेतला आणि तो त्याच्या पुढच्या प्रवासाला निघून गेला. दिवसा मागून दिवस लोटले... मनोजचे परदेशातील शिक्षण पूर्ण झाले व त्याला तिथेच एका चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. मनोजने त्याठिकाणी रहायला स्वतःचे घर घेतले. काही दिवसांनी मनोज हा आपल्या आई-बाबांना घेऊन परदेशात गेला. बघता बघता घरात मनोजच्या लग्नाचा विचार सुरू झाला.

थोड्या दिवसांनी मनोजचे लग्न रुपा नावाच्या मुलीशी झाले. रूपा मनाने खूप स्वार्थी होती. तिला मनोजचे आईबाबा अजिबात आवडायचे नाहीत. मनोज जेव्हा ऑफिसला जायचा तेव्हा रूपा ही आपल्या सासू सासऱ्यांना म्हणजेच मनोजच्या आई-बाबांना जेवण द्यायची नाही. त्यांना खूप वाईट- साईट बोलायची. त्यांचा छळ करायची एके दिवशी मनोजच्या घरी त्याच्या वाढदिवसानिमित्त एक कार्यक्रम आयोजित केला गेला होता. मनोजने आपल्या आई-बाबांना घालायला नवीन कपडे आणले आणि म्हणाला की 'आई, बाबा... हे कपडे तुम्ही आजच्या कार्यक्रमाला घाला. एवढं बोलून तो निघून गेला. नंतर तिथे रूपा आली व तिने त्यांच्या हातातले नवीन कपडे घेतले व फेकून दिले आणि म्हणाले की, तुम्ही जर हे सगळं मनोजला सांगितलं. तर मी तुमच्या मुलाला सोडून घरातून निघून जाईन. एवढं बोलून ती तिथून निघून गेली. तिच्या या वागण्याने आई-बाबांना फार वाईट वाटतं. पण केवळ मनोजच्या प्रेमापोटी ते शांत राहिले. कार्यक्रम सुरू झाला व कार्यक्रमाला मनोजच्या सर्व मित्र आले होते व रूपाचेही नातेवाईक पण आलेले होते. मनोज आणि त्यांचे मित्र बोलत असतानाच तिथे मनोजचे आई बाबा फाटके व मळलेले कपडे घालून आले. सर्वजण पाहून हसू लागले. मनोजला आई-बाबांचा फार राग आला. त्याला त्याच्या आई-बाबांची लाज वाटू लागली. कार्यक्रम संपल्यानंतर मनोज हा आपल्या आई-बाबांवर रागावल त्यांना खूप वाईट साईट बोलला हे सगळं ऐकून त्याच्या आई-बाबांना फार वाईट वाटले. याप्रकाराने रूपाचा डाव यशस्वी झाला होता. रडवेला चेहरा करून रूपाने मनोजला म्हणाली, आपलं परत चारचौघात हसू होण्यापेक्षा आपण तुमच्या आई-बाबांना वृद्धाश्रमात टाकूया. हे म्हणणं मनोजलाही पटलं आणि त्याने लगेचच दुसऱ्या दिवशी आपल्या आई-बाबांना वृद्धाश्रमात ठेवले.



एके दिवशी मनोज हा ऑफिस मधून येत असताना त्याच्या गाडीला

फार मोठा अपघात होतो. त्या अपघातात मनोजचे दोन्ही पाय निकामी होतात. रूपाला जेव्हा हे समजते की, आपल्या नवऱ्याचे दोन्ही पाय निकामी झाले आहेत. तो आता कधीच स्वतःच्या पायावर चालू शकत नसल्याने आता त्याची सर्व कामे आपल्यालाच करावी लागणार म्हणून तिने मनोज बरोबर राहण्यास नकार दिला तेव्हा मनोजला फार वाईट वाटले व पश्चाताप झाला कारण तो त्याच्या आई-बाबांशी वाईट वागला होता.

मनोजने आपल्या जवळच्या मित्राला फोन लावून वृद्धाश्रमात असलेल्या आई-बाबांना घरी घेऊन ये असे सांगितले. थोड्या वेळाने त्याचा मित्र त्याच्या आई-बाबांना घेऊन घरी आला मनोजचे दोन्ही पाय निकामी झाले होते पाहून त्याच्या आई-बाबांना धक्काच बसला त्याही परिस्थितीत आई-बाबा रडत रडत मनोज जवळ गेले. म्हणाले, बाळ.. हे सारे कसे घडले त्यावर मनोजने झालेली सगळी गोष्ट त्याच्या आई-बाबांना सांगितली. मनोजच्या आई-बाबांनी मनोजची खूप काळजी घेतली. मनोजला फार पश्चाताप झाला. त्याने आई-बाबांची माफी मागितली. आई-बाबांनीही त्याला जवळ घेत माफ केले.

***


'वंदना' वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!



सुशिल सुरेश गावडे

✻ माजी विद्यार्थी ✻

वराडकर हायस्कूल, कट्टा.

✻ उपसरपंच तिरवडे ग्रामपंचायत ✻

ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.


## काकासाहेब एक विचारधन...!

महाराष्ट्रामध्ये निसर्ग रम्य सुंदर ते कोकण
या कोकणात काकासाहेब एक विचारधन
त्यांनी घडविले भविष्य अवघ्या गोरगरीब जनेतेच
आम्ही शिक्षण घेतोय आज फक्त त्यांच्या मुळंच
काकासाहेब म्हणजे आमच्या वराडकर हायस्कूलची
आण, बाण आणि शान...
त्यांनी दिले हो वळण आमुच्या वाकड्या जीवनास
त्यांच्या आशिर्वादाने आज कामास सुरुवात करू
अज्ञानाचा नाश करूनी ज्ञान त्यांनी दिला सदाबहार
राहो सदा अशीच माया त्यांची आम्हांवर...



मानसी गरूड
इयत्ता १० वी

## परशुरामाची देन

परशुरामाची देन आमचं रम्य कोकणं
गणरायाची दृष्टी सदा रहे त्यावर
मोरया मोरया जयघोष साऱ्या विश्वात घुमला हो...
बाप्पाला नमन करूया मिळून गणेश चतुर्थीला।।धृ।।

लाडू मोदक पोळ्या तुज आळवती आया बाया
मनो भावे भक्तजण येती तुझं दर्शन घ्याया
तुझा महिमा अपार तू शिव-पार्वती नंदन
तुझ्या दर्शना मोह जाल भक्त ठेवीया बाजूला ।।१।।

दोन मुशकांच्या जोड्या तुज वाहन गणराया
लंबोदरा तू सिद्धीविनायका ये दर्शन आम्हा दयाया
गोड मोदक लाडू तुझं नैवेद्य दावू
तुझ्या भक्तीत रंगुनी मोरया-मोरया गाऊया ।।२।।

मानसी गरुड
इयत्ता १० वी

# माझे खापर पणजोबा....
# योगात्मा – काकासाहेब वराडकर !

**दर्श वराडकर**
इयत्ता सहावी



१९१३ मध्ये बाबुराव म्हणजेच काकासाहेब वराडकर हे मुंबई पाहण्यासाठी म्हणून आपल्या वडिलांसोबत गेले होते व अल्प वास्तव्यास मुंबई भांगवाडी मध्ये त्या वेळचे राष्ट्रीय लोकमान्य टिळकांचे होमरूल वरील भाषण ऐकण्याचा त्यांना योग आला होता. त्या ओजस्वी भाषणाने त्यांच्या मनात देशभक्तीचे बीज पेरलं गेल. लोकमान्य टिळक त्याकाळच्या तरुण भारतीयांचे स्फूर्तीस्थान होते.

१९२१ च्या आरंभाला महात्मा गांधींजीनी मुंबईच्या एस्लेबेड मैदानावर परदेशी मालाची होळी करण्याचा कार्यक्रम घोषित केला होता. त्यांच्या हाकेला ओ देऊन लाखो स्त्री-पुरुष त्या मैदानावर उपस्थित झाले होते व त्यांनी आपले मौल्यवान असे परदेशी कपडे पेटत्या होळीमध्ये फेकले. बाबुरावही त्या वातावरणाशी एवढे समरस झाले होते की त्यांनी आठच दिवसांपूर्वी शिवून घेतलेली सूट पॅन्ट शर्ट वगैरे सर्व विदेशी कपडे त्या होळीमध्ये फेकले. अंगावर नुसती बनियन चड्डीवर ते घरी दादरला गेले

बाबुराव यांनी मुंबई येथे अत्यंत कष्टपूर्वक व जिद्दीने आपला वैद्यकीय अभ्यास पूर्ण केला. मुंबई येथील रेल्वेतील लठ्ठ पगाराची नोकरी सोडून ते गावी आले. गावी येऊन त्यांनी आपला दवाखाना चालू केला. जेव्हा गावोगावी ते रुग्णांना तपासण्यासाठी जायचे तेव्हा त्यांनी पाहिले की गावात मुले चौथीनंतर शाळा नसल्यामुळे मोलमजुरी किंवा शेती करतात. या मुलांना पुढील शिक्षण दिले तर त्यात स्वतःच्या पायावर उभे राहून नोकरी करतील असा त्यांनी विचार केला आणि त्याचवेळी विठ्ठल गुराम आणि त्यांचे सहकारी काकासाहेबांकडे आले आणि त्यांना विनंती केली की आम्हाला इंग्रजी शिकवा आणि नंतर काकासाहेबांनी १५ मुलांना घेऊन इंग्रजी वर्ग सुरू केला. मुलांच्या सहकार्याने रस्ते केले शाळेची नवीन इमारत बांधली आणि त्याचबरोबर कट्टा गावाला पोस्ट ऑफिसही मिळवून दिले व पायलीफंड योजना सुरू केली.

त्यानंतर हिमालयात जाऊन स्वामी शिवानंद यांच्याकडे काकासाहेबांनी संन्यास घेतला आणि नंतर कुणकवळे येथे येऊन त्यांनी आश्रम बांधला त्यांच्या भेटीसाठी हिमालयातील साधुसंत तसेच राऊळ महाराज, भालचंद्र महाराज त्यांना भेटून गेले होते अशी जुनेजाणती मंडळी सांगतात असे होते. आमचे योगात्मा डॉक्टर काकासाहेब वराडकर !

***

# आमची अस्मिता



इंग्रजांची सत्ता घालवली
आणि आम्ही स्वतंत्र झालो
इंग्रजांशी लढताना आम्ही
सारे एक होतो; स्वातंत्र्य मिळताच
एकमेकांशी झगडण्यास मुक्त झालो
आम्ही स्वतंत्र झालो...
इंग्रजांशी लढताना आम्ही फक्त भारतीय होतो
लाल, बाल, पाल आम्हाला सारखेच होते
आता मात्र त्या प्रत्येकाची ओळख स्वतंत्र आहे
बिहारी, मद्रासी, बंगाली, कन्नड, मराठी अशी आहे
प्रत्येकाची वेगळी वेगळी अस्मिता आहे
कारण आम्ही सारे आता स्वतंत्र आहोत

निधी राजन गावडे
इयत्ता : १२ वी (वाणिज्य)



# माझी शाळा

माझी शाळा सुंदर शाळा
शाळा आहे ज्ञानाचे मंदिर
काकासाहेबांचे थोर विचार
म्हणून उभे राहिले हे ज्ञानमंदिर
सर्वांना यश मिळावे
वराडकर हायस्कूलचे नाव गर्जिले
या ज्ञानगृहातून विजयी होवो
हीच आमची प्रार्थना

वेदा प्रविण मराठे
इयत्ता : ६ वी



# कोरोनाचो इस्कोट

पुस्तकांमुळे घडलेली पोरा
आज मोबाईलमुळे बिघाडली
लापाछपी इसारली नी
फ्री-फायर शिकली

मोबाईलच्या नादापाई
अभ्यास कलचो इसारली
कोरोनाच्या महामारीत
घरात बसान कंटाळली

मास्क शिवाय खय परवांगी नव्हती
लसी शिवाय औषध नव्हता
शाळा उद्या उघडात या आशेवर
दोन वर्षा उलटान गेली
मंदिरासारख्या शाळेक कोरोनान
टाळा घातल्यान
कोरोनाच्या विषाणून पोरांच्या आयुष्याचो
खेळ केल्यान...!

सुहानी जनार्दन झोरे
इयत्ता : १० वी (ब)

# एक गाऊ आम्ही विठोबाचे नाम...!

**प्रफुल्ल देसाई**
मालवण




विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी।
विठ्ठल तोंडी उच्चारा..।।
विठ्ठल नाद विठ्ठल भेद ।
विठ्ठल छंद विठ्ठल ।।

विठ्ठल नामाचा महिमा अगाध असा आहे. या विठ्ठल नामापायी म्हणा किंवा भक्तीच्या सोहळ्याने देव ही वेडाहून जातो आणि तो वैकुंठ त्यागून निर्गुणातून गुणात येतो आणि म्हणूनच संत महंतांनी म्हटले आहे की भाव तोचि देव. भाव ही भक्तीची पूर्णावस्था आहे. आणि या पूर्णावस्थेपायी देव भक्तांकडे हा धाव घेतो. या भक्तीच्या महिमेला महाराष्ट्रात तर अनन्य साधारण महत्व आहे कारण महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. अनेक संत महंतांनी.... वारकरी संप्रदाय असेल किंवा अन्य संप्रदायाच्या माध्यमातून या इथल्या माणसांमध्ये श्रद्धा जागवली. आणि या श्रद्धेतूनच इथला महाराष्ट्र घडत गेला. दिवसामागून दिवस लोटले वर्षामागून वर्षे लोटली हो.... शतकेही पार झाली मानवाने चंद्रावर पाऊलही टाकले विज्ञान युग सुरू झाले. मात्र आजही भाव भक्तीमध्ये तसूभरही कमी झाली नाही. म्हणूनच या भूमीत जागोजागी श्रद्धास्थाने आढळून येतात. मालवणी मुलुखात तर ही श्रद्धास्थाने पावला पावलावर आढळतात त्या श्रद्धास्थानांमध्ये रामेश्वर, रवळनाथ गांगेश्वर भरतेश्वर, वेताळ, सातेरी भराडी, भवानी, पावणाई, माऊली, अशी कितीतरी नाव सांगता येतील जी मालवणी मुलखातील ग्रामदैवते बनली. परंतु जेव्हा पंढरीचा विठोबा मालवणी मुलखातल्या कट्टा ग्रामी येऊन रुक्मिणी माते समवेत कडेवर हात घेऊन उभा राहून ग्रामदैवत बनतो आणि ते बनतानाच भक्तांच्या हाकेला धावून जात त्यांच्या प्रश्नाचे निराकारण करतो तेव्हा श्रद्धावान भाविकांच्या ओठी सहजपणे शब्द उमटतात... एक गाऊ आम्ही विठोबाचे नाम! आणिकांचे काम नाही आता... ही अनुभूती विठुरायाला भजणाऱ्या प्रत्येकाची आहे आणि आजकालची नव्हे तर ती शतकानुशतकाची आहे.

मालवणपासून वीस किलोमीटर अंतरावर असलेले कट्टा हे वाडी वजा गाव ! मालवण कसाल हमरस्त्यावरच हे गाव वसलेले असल्याने मालवणकडे ये जा करणाऱ्यांचे हे गाव नेहमीच लक्ष वेधून घेत आहे. याला कारण म्हणजे कट्टा बाजारपेठेत असलेले विठ्ठल रखुमाई व लक्ष्मी नारायण

मंदिर होय. खरतर कट्ट्याच्या या विठ्ठल रखुमाई राईच्या मंदिराची ही कहाणी आजकालची नाही. तर तिला शेकडो वर्षाची परंपरा आहे. किती वर्ष कोण जाणे मात्र, एक गोष्ट खरी १८६२ साली या विठ्ठल रखुमाई मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी श्री विठ्ठल रखुमाईची मूर्ती पुन: प्रतिष्ठापना करण्यासाठी काढण्यात आली त्यावेळी या मूर्तीच्या खाली १८६२ सालची नाणी मिळाली. ती नाणी या मंदिराची प्राचीनता स्पष्ट करणारी ठरली आहे.

या मंदिराच्या इतिहासाचा मागोवा घेण्याच्या दृष्टिकोनातून कट्टा गावातील जुन्याजाणत्या वयोवृद्ध मंडळींशी संवाद साधला त्यातील अरविंद नेवाळकर हे वयोवृद्ध ग्रामस्थ या विठ्ठल मंदिराविषयी भरभरून बोलले. कट्टा गावच्या या विठ्ठल रखुमाईच्या मंदिरासाठी नांदोस गावच्या बापूजी नारायण नाईक वराडकर यांनी आणि त्यांच्या वंशजानी मंदिरासाठी जमीन दान दिली. त्यानंतर सुमारे पन्नास वर्षांनी म्हणजेच १९१० साली या गावचे ग्रामस्थ गोविंद गणेश माणगावकर या विठ्ठल भक्ताने पंढरपूरच्या विठुरायाच्या मंदिराला भेट दिली तिथला गोपालकाला आणि पालखी उत्सव पाहिला आणि कट्टा येथील विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात ग्रामस्थांच्या सहकार्याने गोपालकाला सुरु केला. हे करत असताना पंढरपूर वरून आणलेल्या उत्सव मूर्ती पालखीत बसवून हा सोहळा सुरु केला तो आज मितीपर्यंत सुरु आहे. त्यानंतर १९४० ते १९४५ साली नवीन पालखी सुरु करण्याचे योजले गेले आणि हा सोहळा सुरुही झाला. त्यानंतर १९५३ साली कट्टा गावातील काका माणगावकर हे शिक्षणाच्या निमित्ताने प्रशिक्षणासाठी म्हणून मिठबाव येथे गेल्यानंतर मिठबाव येथील विठ्ठल मंदिरात हरीनामाच्या माध्यमातून जो विठू नामाचा गजर सुरु होता तो गजर काका माणगावकर यांना भावला. त्यांनी कट्टा येथे येऊन आपल्या मित्रमंडळीना आपल्या मनातील बेत सांगितला आणि मग कट्टा गावातील मुरारी रेवडेकर, रमाकांत पडते, मधुकर गाड, मनोहर भोगटे, मनोहर खटावकर, रामा पोयरेकर (मुसळे), बापू शिरोडकर या मंडळींनी मिठबावच्या विठ्ठल मंदिरात सुरु असलेला दिंड्या आणि हरीनाम सप्ताह पाहिला आणि त्याच वर्षापासून कट्ट्याच्या या मंदिरात हरीनाम सप्ताह व दिंड्यांच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. या हरीनाम सप्ताहाची मजा काही औरच असायची. आजही हरीनाम सप्ताह व पालखी सोहळा होतो त्याची रंगत तेवढीच टिकून आहे. कट्ट्याच्या या विठ्ठल रखुमाई मंदिरात श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवार पासून जो हरीनाम सप्ताह सुरु होतो त्या हरीनाम सप्ताहामध्ये त्या काळात दिंड्या तसेच आकर्षक आणि लक्षवेधी चित्ररथ साकारले जायचे. हे साकारण्यासाठी काका माणगावकर, रमा पडते, दादा मोरजकर, मनोहर परब, मनोहर खटावकर वैगरे मंडळी आपल्या तोंडाला रंग फासून विविध भूमिका वटवायचे. विशेष म्हणजे हे देखावे पाहण्यासाठी कट्टा पंचक्रोशीतीलच नव्हे तर कुडाळ, कणकवली, कसाल याठिकाणचे लोक खासकरून हे चित्ररथ पाहण्यासाठी यायचे. एकंदरीत हरीनाम सप्ताहाच्या माध्यमातून या भागातील लोकांमध्ये श्रद्धा प्रबळतेने जागविण्याचे काम केले. लोकांना हरीनामाची गोडी लावली. वीस वर्षांपूर्वी ऋतू मानाप्रमाणे श्रावण महिन्या ऐवजी कार्तिक महिन्याच्या तृतीयेला हरीनाम सप्ताह साजरा करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार दुपारी बारा वाजता या मंदिरात घट बसवीला जातो आणि कार्तिक महिन्याच्या दशमीला या अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता होते.

या मंदिरात अश्विन शुद्ध पौर्णिमेला काकड आरती सुरु होऊन ती कार्तिक पौर्णिमेपर्यंत असते. या मंदिरात १९२० सालापासून काकड आरती परंपरेला सुरुवात केली.. सुरुवातीच्या काळात श्री. गोविंद माणगांवकर, विठ्ठल माजगांवकर, पांडुरंग साटविलकर, हिरवे, एकनाथ भोगटे, बापू मोगरणेकर, यशवंत गिरकर, आप्पा रेवडेकर, यशवंत पावसकर, आदी मंडळीनी त्या काळात काकड आरती सुरु ठेवली होती. त्यानंतर धुलीवंदन कार्यक्रम तसेच धुलिवंदन समाप्ती निमित्त दशावतारी नाटक सादर केले जाते. त्यानंतर चैत्र नवमीला राम जन्मोत्सवाचा कार्यक्रम संपन्न होतो. या मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यात दीपोत्सवाचा कार्यक्रम हा लक्षवेधी असतो.

२०१८ सालची गोष्ट आहे. कट्टा गावातील हे श्री देव विठ्ठल-रखुमाई, राईचे मंदिर जीर्णावस्थेकडे जात असल्याचे कट्टा ग्रामस्थांना जाणवले. कट्टा गावचे रहिवासी संतोष साठविलकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या मंदिराचा जीर्णो

द्धार करण्याचा संकल्प सोडला. श्री देव विठ्ठल रखुमाई मंदिर फार जीर्ण झाल्याने मंदिराचे नुतनीकरण करण्याचे आणि पुन: प्रतिष्ठापना करण्याचा संकल्प श्री. संतोष साटविलकर यांनी ग्रामस्थांसमोर मांडला त्यास ग्रामस्थ यांनी पाठिंबा देऊन विठ्ठल मंदिराच्या नुतनीकरणासाठी २०१८ पासून सुरुवात करण्यात आली. आणि याच संकल्पसिद्धीची आज पुर्तता होत असून श्री देव विठ्ठल- रखुमाई राई ,लक्ष्मी नारायण मंदिर पुर्णत्वास आल्याने एक संकल्पपूर्ती झाली आहे

या मंदिराची नुतनीकरण रचना आर्किटेक्ट श्री. रविंद्र नाईक कोल्हापूर यांच्या मार्गदर्शना खाली विविध कारागिरांमार्फत आणि ग्रामस्थांच्या आर्थिक देणगीतून हे मंदिर पुर्णत्वास गेले आहे. मंदिराच्या मध्यभागी गाभाऱ्यात राई रुक्मिणीसह श्री देव विठ्ठल विराजमान आहेत. पहिल्या गाभाऱ्यात श्री लक्ष्मी नारायण तर तिसऱ्या गाभाऱ्यात श्रीगणेशाची मूर्ती स्थापित करण्यात आली आहे. मंदिराच्या प्रांगणात महापुरुष व जैन ब्राम्हण तसेच गरुड हनुमान आणि तुळशी वृदांवन विराजमान आहेत. प्रति पंढरपूर म्हणून नावारूपाला येत असलेले कट्टा गाव हे नजीकच्या काळात धार्मिक पर्यटन स्थळ बनून या गावात आर्थिक सुबत्ता नांदू दे हीच विठुरायाच्या चरणी प्रार्थना !

***

# संस्थेच्या वतीने शिक्षण संस्थेच्या वेबसाईटचे अनावरण

कट्टा येथील कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने वराडकर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, वराडकर इंग्लिश मिडीयम स्कुल, आणि डॉ दादासाहेब वराडकर आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयाच्या उपक्रमांची माहिती देणाऱ्या www.kpspmkatta.in या संकेतस्थळाचे अनावरण संस्था अध्यक्ष श्री. अजयराज वराडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्था सचिव सुनील नाईक श्रीमती विजयश्री देसाई, संचालक श्री. महेश वाईरकर, संचालिका सौ. स्वाती वराडकर, स्कूल कमिटी चेअरमन श्री. सुधीर वराडकर, श्री. सुरेश कदम, वराडकर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. देवयानी गावडे, वराडकर इंग्लिश मीडियमचे मुख्याध्यापक श्री. ऋषिकेश नाईक, वराडकर सीनियर कॉलेज कट्टाचे प्राचार्य श्री. ध्वजेंद्र मिराशी, पर्यवेक्षक श्री महेश भाट, उपप्राचार्य प्रा. रवींद्र गावडे व ज्येष्ठ शिक्षक रवीकुमार गावडे, प्रा. श्रुती कुंभार व श्री. मिलिंद कदम शिक्षिका, श्रीमती. संपदा पोकळे आदी मान्यवर उपस्थित होते.



**संस्थेच्यावतीने शिक्षण संस्थेची तसेच तीनही विभागाची माहिती देणाऱ्या वेबसाईटचे अनावरण करताना अजयराज वराडकर सोबत अन्य मान्यवर**

यावेळीसंकेतस्थळाचीनिर्मिती करणाऱ्या वराडकर हायस्कूलचे माजी विद्यार्थी श्री. मंदार गावडे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी अजयराज वराडकर यांनी संस्थेच्या संकेतस्थळावर आत्ता कट्टा संस्था व संस्थेचे तिन्ही विभाग यांचे विविध उपक्रम, कार्यकम यांची माहिती उपलब्ध होणार असून, यामुळे उल्लेखनीय कार्याचा प्रसार व प्रसिद्धी होण्यास मदत होणार आहे. संस्था संचलित तिन्ही विभाग प्रमुख व संबधित शिक्षक आणि कर्मचारी यांनी संस्था संकेतस्थळाचा योग्य जबाबदारीपूर्ण वापर करावा असे आवाहन केले

***वराडकर हायस्कूलचे तत्कालिन मुख्याध्यापक श्री. संजय नाईक यांनी आपल्या निधनापूर्वी लिहिलेली पहिली वहिली आणि दुर्दैवाने अखेरची ठरलेली कट्टा पंचक्रोशि शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक योगात्मा डॉ. कै. काकासाहेब वराडकर यांच्यावर लिहिलेली कविता या अंकात आम्ही समाविष्ट करीत आहोत.***

## शाळा योगात्मांची......

योगात्मा काकासाहेबांची
थोर असे पुण्याई
अवतरली ज्ञानगंगा
कट्टा गुरामनगरी ठाई
करुनी समर्पण
उभारली शाळा
बनविले सज्ञान
दशक्रोशीतील बाळा
दादासाहेब अन शरदरावांनी
चालविला पुढे हा वसा
सहस्त्र विद्यार्थी घडले
अन उमटविला आपला ठसा
अभ्यास, कला, क्रीडा क्षेत्री
विद्यार्थी अमुचे निपूण
गुरुजनांच्या अथक प्रयत्ने
मिळविले यश दैदिप्यमान
स्वच्छ शाळा सुंदर शाळा
उपक्रमी बनलो एक नंबरी
प्रयत्न करू अथक
करण्या शाळेचे नाव जगभरी
साजरा करू अत्यानंदे
शाळेचा शतक महोत्सव
नभुतो न भविष्यती
संपन्न व्हावा हा उत्सव
ठेवुनी विश्वास परस्परा
धरू अवघे सुपंथ
नतमस्तक काकांच्या चरणी
घालूनी साष्टांग दंडवत..!



## मी शिवकन्या बोलतेय...

छत्रपती शिवाजी महाराज नमस्कार नाही माफ करा
मला करता येणार नाही मुजरा...
कारण मुजरा करायला वाकेन तेव्हा माझ्यावर पडतील नजरा
ऐकताना थोडं खटकेल
वाटेल हे राज्यात चाललंय काय
पण दुर्दैवाने येथे नाही सुरक्षित
कोणाची बहिण, कोणाची माय
आपल्याच मातीत चालताना
स्वत:ची माती होताना पहावं लागतं
सारे उपभोग तर घेतातच
नंतर जीवानीशी मारतात
शिक्षा व्हायचं लांब फक्त कॅन्डल मार्च चालतात
अत्याचार होतो दहा मिनिटात
नंतर कित्येक वर्ष न्यायाची वाट पहावी लागते
न्यायाच्या प्रत्येक टप्प्यावर पुन्हा तेच तेच पहावे लागते
न्यायाच्या प्रत्येक टप्प्यावर पुन्हा तेच तेच पहावे लागते
शिवरायांचे फक्त धडे वाचले आम्ही
बदल काही होत नाही
माझ्या शिवाजी राजांनी स्त्रियांना दिलेली वागणूक
अजूनही कोणालांच मिळत नाही
अत्याचार करणाऱ्याला जागीच मारा
आता तरी स्त्रीयांचा सन्मान करा
आता तरी स्त्रियांचा सन्मान करा...!

प्रज्ञा प्रशांत सावंत
इयत्ता : १२ वी (वाणिज्य)

# ऐतिहासिक वारसा लाभलेला धामापूर तलाव !

**निलेश नितीन सावंत**
अकरावी (वाणिज्य)

जागतिक वारसा सिंचन स्थळ हा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळवणारा धामापूर तलाव हा महाराष्ट्रातील पहिला एकमेव तलाव आहे मालवणी मुलखात एक प्रसिद्ध म्हण आहे.... उरला सुरला धामापूरच्या तळ्यात! विपुल निसर्ग संपदा आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या धामापुर तलावाने आजवर अनेक जीवांना आपल्या कुशीत आसरा दिला आहे आणि कित्येक शतकांपासून मानाचा दर्जा मिळविला आहे जुन्या जाणत्या माणसांच्या बुद्धिमत्तेचे प्रतीक म्हणून दृष्टिकोनातून झालेला अभ्यास जुन्या काळातील सिंचन पद्धती अशा अनेक विषयांचे सखोल अध्ययन विशेषज्ञाकडून करण्यात आले या अभ्यासामुळे धामापूर तलाव हा केवळ एक पाण्याचा साठा नसून पाचशे वर्षापासून हस्तांतरित करण्यात आलेला जिवंत वारसा आहे हे डोळ्यासमोर आले

धामापूर परिसरात जंगली वृक्ष वनस्पतींचे संवर्धन आणि संरक्षण व्हावे तसेच जंगल जलस्रोतांना प्रवाहित ठेवता यावे म्हणून तत्कालीन राजे, सरदार यांनी प्रयत्न केले



आज धामापुर तलावाच्या रचनेकडे बघितले जाते २०२० मध्ये जागतिक वारसा सिंचन स्थळ ही आंतरराष्ट्रीय सन्मान मिळवणारा धामापुर तलाव आहे

सतत पाच वर्षानंतर जागांच्या संवर्धनात्मक कार्यामुळे धामापूर तलावाच्या विविध पैलूंचा सखोल अभ्यास झाला धामापूर तलावा किनारी सापडलेल्या दुर्मिळ सजिवांचा आधिवासी तलाव व मंदिराच्या मौखिक आणि लिखित इतिहास, गाव समाज व मंदिराच्या स्थापत्यशास्त्राच्या होते आणि त्यांचा परिभाग म्हणून धामापुर तलावासारखे बारमाही पाणी पुरवठा करणारे जलस्रोत जीवनदायी संचित ठरले होते २०२० मध्ये जागतिक वारसा सिंचन स्थळ म्हणून अधिसूचित करण्यात आलेल्या धामापूरच्या महाराष्ट्रातील पहिला आणि एकमेव तलाव ठरलेला आहे हे धामापूरवासियांच्या एकंदर दूरदृष्टीचे आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक या नात्याने पाहिले जाते ही उल्लेखनीय बाब आहे

***

## आयुष्य

आयुष्याच्या वळणावर
अडचणीचा डोंगर होता
स्वत:लाच स्वत:चा
खंबीर आधार होता

निघून गेली ती कधी
आपली नवतीच खोट्या
दुनियेत वावरताना
माणसांची पारख नव्हती

वेळेने रडवले
परिस्थितीने शिकवले
अनुभवाचे धडे घेत
आयुष्य जगायला शिकले

आयुष्यात पुढे जाताना
मागेवळून पाहू नको
उरेल बरेच कांही
त्यात तू अडकून राहू नको

वेळ दाखवत जाईल
परिस्थिती शिकवत जाईल
आयुष्यात बरेच निर्णय घेताना
दु:ख तुला होत राहील

मनाने मनाला समजवलं
की मनही समजते
स्वत:लाच स्वत:ची साथ देत
आयुष्य घडवते

सुहानी जनार्दन झोरे
इयत्ता : १० वी (ब)



## माझ्यातली मी !

हो ! हो ! तूच
झाल असेल रडून तर
माझं जरा ऐकशील का?
नव्या जगात वावरताना
आयुष्याचे चित्र रंगवलेस मग
भूतकाळाच्या आठवणीत
भविष्य का बर बिघडवतेस
नाती जोडण्यासाठी
चेहऱ्यावरच हसू पुरेस असतं मग
दु:खी राहून कशाला
स्वत:ला एकटं वाटून येतेस
छोटसं असतं आयुष्य आपलं
आनंदाने जगून घेत जा
पुर्नजन्म नसतो गं कधी
म्हणून मनमोकळं जगत जा

सुहानी जनार्दन झोरे
इयत्ता : १० वी (ब)

## सुख

सुख म्हणजे असते काय
सुखाची पण किंमत असते
दु:ख भोगल्याशिवाय सुख नसते
ते सहज कधी मिळत नसते
आज काल असे सुख हवे कुणा ?

खुल्या बाजाराच्या दुनियेत
सर्व काही रेडिमेड मिळते
टिकाऊ नाही तर विकाऊ असते
म्हणूनच तर सुख सहज मिळते

कु. निधी राजन गावडे
इयत्ता बारावी

# संस्कृत भाषेचे महत्त्व

**वेदांत सुशांत परब**
इयत्ता दहावी



संस्कृत ही सर्वात प्राचीन भाषा असून ती सर्व भाषांची जननी आहे. बोलण्यासाठी या भाषेचा उपयोग कमी झाला असला तरी आजही तिचे महत्त्व कायम आहे. हिंदी, मराठी, पंजाबी यासारख्या आधुनिक भाषांचा उगम संस्कृत भाषेतून होतो. संस्कृत या भाषेची प्राचिनत्वाची कल्पना यावरून येते की, सर्वात प्राचीन हिंदू ग्रंथ ऋग्वेद याची रचना इसवी सन पंधराशे – एक हजार वर्षाची मानली जाते.

ही भाषा समृद्ध करणारे भाषा तज्ञ महर्षी पालीनी, महर्षी कात्यायन आणि महर्षी पतंजली हे आहेत. संस्कृत भाषा ही सर्वात परिपूर्ण भाषा असून तिचे वाचन केल्याने स्मरणशक्ती वाढते असे संशोधन सांगते. संस्कृत भाषेचे अनेक ग्रंथ विविध संग्रहालय यामध्ये जतन केलेले दिसतात. संस्कृत भाषेचे अनेक शब्द विविध आधुनिक भाषांमध्ये आढळून येतात. त्यामुळे संस्कृत भाषा ही देशाला एकात्मतेच्या धाग्यात बांधून ठेवू शकते.

संस्कृतमधील श्लोक उच्चारले तरी वाणीतील बोल शुद्ध होण्यास मदत होते. सर विल्यम्स जोन्स यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ संस्कृत' या ग्रंथात त्यांनी संस्कृत भाषा ही ग्रीक भाषेपेक्षा श्रेष्ठ आहे. लॅटिनपेक्षा ती विपुल आहे. व्याकरणाच्या दृष्टीने ती दोघींपेक्षा मजबूत आहे.

संस्कृत भाषेचे व्याकरण तर्कशुद्ध आहे. त्यामुळे अनेक अभ्यासकांना तिची ओढ निर्माण होते. संस्कृत भाषेचा अभ्यास करणारे विद्यार्थी उत्कृष्ट बोलू शकतात. कारण या भाषेने त्यांचे बोल शुद्ध केलेले असतात. अध्यात्म, विज्ञान व तत्वज्ञान यांचा समावेश असलेले अनेक प्राचीन ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यामुळे ही भाषा समृद्ध व ज्ञानभाषा मानली जाते. संस्कृत भाषेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकारने या भाषेचे जतन व्हावे यासाठी त्यांनी अनेक फायदे व सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत.

संस्कृत भाषेमधील प्रत्येक वाक्यामधील नाम, सर्वनाम, विशेषण यांच्यासाठी सुयोग्य असे विभक्ती प्रत्यय व क्रियापद यासाठी व्याकरणातील पुरुषाप्रमाणे प्रत्येक उपलब्ध आहेत. त्यामुळे या भाषेच्या वाक्याची रचना सुयोग्य व तर्कशुद्ध होण्यास मदत होते. त्यामुळे ही भाषा व्याकरणरित्या सर्वात समृद्ध ठरते. संस्कृत पद्यांमधील रचना अशी तर्कशुद्ध असल्याने त्यामध्ये नादमयता निर्माण होण्यास मदत होते.

संस्कृत भाषेमध्ये जीवनाचे सार सांगणारे अनेक प्राचीन ग्रंथ आहेत. जसे की भगवद्‌गीता, रामायण, यासंबंधी उपलब्ध आहेत. जैन, बौद्ध यासारख्या अनेक धर्माच्या अनेक धार्मिक ग्रंथ संस्कृत भाषेमधून उपलब्ध आहेत.

एखाद्या भाषणासाठी तयारी करत असताना जर त्या भाषणाच्या विषयाशी निगडित काही श्लोक जर अर्थ जाणून पाठ केले, तर भाषणात श्रोत्यांवर चांगल्या प्रभाव पडतो व त्या विषयाचे विश्लेषण करण्यास सहाय्यभूत ठरेल. म्हणूनच संस्कृत शिकणे म्हणजे केवळ एक प्राचीन भाषा शिकणे नाही. तर एक अत्यंत व्यापक आणि प्रगल्भ सांस्कृतिक वारसाशी जुळवून घेणे होय.

***

## पाऊस



मला कधी कधी पाऊस
हवाहवासा वाटतो
कोसळणाऱ्या पावसात
चिंब होऊन भिजावसं वाटते

मला कधी बरसणारा पाऊस
कंटाळा यावा एव्हढा पडतो
तेव्हा मला तो जावाजावासा वाटतो

माणूस म्हणून जगतोय आम्ही
आम्हालाही नवासारखं व्हावसं वाटतं
पाणी बनून आम्हाला
जटणवराना जीवन देण्यासारखं वाटतं

मधुर अर्जुन पेंडूरकर
इयत्ता : ५ वी

## पाऊस

खिडकीच्या तावदानावरून ओघळणारा पाऊस
घरात बसूनच पहायचा नसतो
कोसळणारा पाऊस अंगावर झेलायचा असतो
ओले चिंब होऊन पाऊस
अंगावर ओघळवायचं असतो साचलेल्या
डबक्यात हुंदडायचं असतं
तुडुंब भरलेल्या डोहात
मनसोक्त डूबायचं असतं
पाऊस आडोशाला राहून पाहायचं नसतो
पाऊस अंगावर झेलत मिरवायचं असतो

कु. निधी राजन गावडे
इयत्ता : १२ वी

## पर्यटकांचा आवडता मालवण

माझ्ा मालवणची वारी
थोडो दमट, थोडो गार
रसाळ फणसाची गरी
तब्यतिक तुमच्या एकदम बरी

समुद्र किनाऱ्यावरची सफेद माती
किक भीजी नाय कसली
पर्यटकांची गर्दी दिवसा राती
खुश होऊन सगळे घराक जाती

आंबे, करंदा, काजू, फोपळी
तहान लागली आडसरा काड
खाऊक हीयो मासे हाड
उरले थोडे पाण्याक धाड



किल्लो बघुक गर्दी वाढता
हीडयेंची दर चढता
वारो वाढल्यास होडी हलता

किल्ल्यावर पोचल्यावर बरा वाटता
राणीच्या येकेक पर्यटक नाचता
किल्ल्या वरसून सगळा दिसता
होडयेतून येताना परत धडकी भरता

धक्यावर उतरल्यावर सुटलत म्हणतात
किल्लो बघल्याचा समाधान वाटता
उतरल्यावर पयलो झाडाच्या सावलेक बसता
मग मात्र समाधानात हसता

प्रथमेश जाधव
इयत्ता : ९ वी (ब)

# कला उत्सव मधील माझा अनुभव !

**कु. साक्षी रवींद्र नाईक** (अकरावी)
वराडकर इंग्लिश मीडियम स्कूल

प्रवास तर आपण रोजच करतो; पण काही प्रवास हे असे असतात की ते आपले अस्तित्व शोधण्यासाठी मदत करतात. माझाही असाच काहीसा प्रवास घडला आहे... निमित्त होत ते कला उत्सव २०२२ मध्ये माझी निवड होणे ! कला उत्सवात शास्त्रीय नृत्य यासाठी माझी निवड झाली, खरं तर कला उत्सवमधील हा माझा पहिलाच अनुभव होता. ही कला माझ्यात रुजवली ते माझे गुरु श्री. तुळशीदास आर्लेकर सर यांनी! पण या माझ्यातील कलेला वाव देण्याचे काम आमच्या प्रशाळेचे कलाशिक्षक श्री. समीर चांदरकर सर यांनी केले. चांदरकर सरांनी माझ्या डान्सचा व्हिडिओ करून कला उत्सवाला पाठविला आणि माझी जिल्हा स्तरावरून राज्यस्तरावर निवड झाली. कला उत्सवामध्ये माझ्यासोबत आमच्या शाळेतील पूर्वा चांदरकर, द्वितीज गवाणकर, पार्थ नलावडे, ओंकार राऊळ, अवधूत आचरेकर, रीया भगत, ममता आंगचेकर, प्रतीक्षा मेस्त्री या आठ मुलांची निवड झाली होती.



पुणे येथे पंडित भीमसेन कलादालन येथे कला उत्सवाची स्पर्धा असल्याने २१ नोव्हेंबर रोजी पुण्याला आम्ही जायला निघणार होतो. पुण्याला प्रयाण करण्याअगोदर देवाला गाऱ्हाणे घालून आणि आमच्या शाळेचे मुख्याध्यापक व इतर सर्व शिक्षकांनी कौतुकाची थाप व मोठयाचे आशीर्वाद घेऊन आम्ही पुण्याला निघालो. मला या प्रवासात पूर्वा चांदरकर सारखी मैत्रिणी मिळाली. आम्ही आधी एकमेकींना एवढे ओळखत नव्हतो. पण या प्रवासात आमची खूप चांगली ओळख झाली. तिच्यातील धाडसी वृत्तीमुळे मला तिचा स्वभाव खूप आवडला. पुण्यात पोहोचल्यावर तेथे राहण्याची सोय आमच्या शाळेचे तेव्हाचे मुख्याध्यापक श्री. नाईक सर यांच्या नातेवाईकांकडे केले होते. त्या काकीने आम्हा सर्वांची राहण्याची खूप छान सोय केली होती.

कला उत्सवातील पहिल्याच दिवशी पार्थचे गायन आणि पूर्वा व द्वितीज या सवंगड्याचे नाट्य हे खूप छान झाले. दुसऱ्या दिवशी ओंकार दादाचे मृदंग वादन व माझा डान्स होता. माझे सादरीकरण खूप छान झाले. श्री. चांदरकर सर, आणि गावडे सर यांचे उत्तम सहकार्य लाभले. आम्ही तिथे खूप मजा केली. पुण्यातले दोन दिवस कसे गेले हे कळलेच नाही. ते दोन दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय असेच होते. हे दिवस कधीच संपू नयेत असेच वाटत होते. तिथल्या आठवणी घेऊन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो कला उत्सवात आम्हाला ज्यांच्यामुळे संधी प्राप्त झाली. ते वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेचे आणि संस्थेचे शतशः ऋणी राहीन. अशा प्रशालेत मला शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाले, हे मी माझे भाग्य समजते.

***

## आई



आई माझी मायेचा सागर
तिने दिला जीवना आधार
झप झप उचलीत पाय
मागे वळून बघितले जाय
ममतेने जाई सांगत
नका बसू कुणाशी भांडत
जशी भिंतीला चिपकते पाल
तशी आई बनते बाळासाठी ढाल
शिवबाला आईने घडवले
तसेच माझ्या आईने मला घडवले
काय सांगू तुझे गुण
कसे फेडू तुझे ऋण
आईची माया समजून
घेतली चादर ओढून

सिमरन संदीप गरुड
इयत्ता : ८ वी

## मुंगीबाई



मुंगीबाई, मुंगीबाई काम करतेस
फार सदा कदा कामाचा डोईवर भार
मुंगीबाई कशी तू रांगेत धावतेस
मैत्रिणींशी बोलताना नाकाला नाक लावतेस
मुंगीबाई वेचतेस साखरेचे कण
वाया घालवत नाहीस एक सुद्धा क्षण
मुंगीबाई साखर साठवलीस किती?
भरले असतील घरी शंभर तरी पोती
मुंगीबाई तुझ्याकडे जेवायला येऊ
मी बाई आहे फार गोड खाऊ

कु. सिद्धी दशरथ गुराम
इयता : ५ वी

## माझे जीवन

मित्र – शत्रू कळला नाही
गणित जीवनाचे सुटले नाही
ज्यांनी मला समजून घेतलं
असा कोणी भेटला नाही
प्रेम मी वाटीत गेले
प्रेम कधी मिळालं नाही
दिवस नाही असा कोणता
जशी मी लढले नाही
लढले मी वादळाशी
पण कधी हरले नाही
दुःख आले किती तरी
पण मी नाही डगमगले
नाही सोडली साथ सत्याची
खोटेपणाने जगले नाही
रुसले अगदी जवळचे
तरी पण मी थांबले नाही
मी कोणाला कळले नाही आणि....
कधी कोणाला कळणारही नाही !

कु. सानिका काशीराम परब
इयत्ता : ११ वी (कला)

## माझी आई



आई म्हणजे ईश्वर
आई म्हणजे देवता
जगातली पहिली मैत्री
म्हणजे आई मुलीची
एक आई तिच्या बाळाला
जन्म देताना तिने काय काय
सहन केले असेल
आई मुलीचं नातं
काही वेगळंच असतं ना

कु. ईश्वरी दर्पण मेस्त्री
इयत्ता : ६ वी

# राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक ऐक्याचे कार्य

**कु. हर्षदा किसन हडलेकर** (दहावी)
वराडकर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कट्टा

राजवैभव थोर असेल पण मी रयतेशी वचनबद्ध आहे. ती वचनबद्दता त्या वैभवाहूनही थोर आहेत, असे ज्यांनी मानले, उपेक्षित वंचित घटकांना मानसिक गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी समाजात पुरोगामी विचार रुजवणारे, शेतकऱ्यांचे तारणकर्ते, बहुजनांचे पालनकर्ते नोकरीत आरक्षण निर्माण करून महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारे सामाजिक ऐक्याचे प्रणेते म्हणजे... छत्रपती राजर्षी शाहू महाराज.



राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे महाराष्ट्राच्या आणि संपूर्ण भारताच्या इतिहासातील एक लोककल्याणकारी महान व्यक्तिमत्व होते. शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथे झाला. त्यांचे बालपण अत्यंत साधेपणाने आणि धार्मिक वातावरणात गेले. प्राथमिक शिक्षण कोल्हापूरमध्ये घेऊन उच्चशिक्षण पुण्याच्या राजाराम कॉलेजमध्ये पूर्ण केले.

समाज सुधारण्याचे वृत्त घेतले
वाण सतीचे त्यासी मानिले
सारे जीवन ज्यांनी अर्पण केले
तेच शाहू महाराज राजर्षी जाहले

१८९४ मध्ये शाहू महाराजांनी संस्थानाच्या कारभाराला सुरुवात केली. राज्यभर फिरून लोकांची परिस्थिती गरजा व त्यांनी दुःख जाणून घेतले. त्यांच्या भावना ओळखून त्यांचे दुःख निवारण्याचे काम आयुष्यभर केले. अज्ञान, अंधश्रद्धा, अस्पृश्यता यातील व्याधी निपटून काढल्या खेरीज प्रजेचा विकास होणार नाही. हे त्यांनी ओळखले व कामाला सुरुवात केली. कोल्हापूर संस्थानचे राजे हे पद विसरून महाराजांनी लोकशाही पद्धतीने राज्यकारभार केला. प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यासाठी अनेक पाऊले त्यांनी उचलली. राज्यातील कृषी उद्योग विकासासाठी कारखाने आणि उद्योग सुरू केले. संगीत, क्रीडा, नाट्य आणि नृत्य यासारख्या विविध कला प्रसारासाठी प्रयत्न केले. कोल्हापूरला कुस्तीची पंढरी हे नाव मिळवून देण्यास शाहू महाराजांचे फार मोठे योगदान होते. त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदान यापैकी आणखी एक म्हणजे शाहू शिक्षण संस्थेची स्थापना ज्याचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना दर्जेदार शिक्षण प्रदान करणे हा होता.

राजर्षी शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतिशील पुरस्कर्ते होते. त्यांना दलित समाजावर मायेची पाखर घालणारा लोकोत्तर राजा म्हणून ओळखले जाते. समाज सुधारण्यासाठी त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. त्यांनी जातीय भेदभाव अस्पृश्यता आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचा निर्णय हा भारतीय इतिहासात सामाजिक न्यायाच्यादृष्टीने महत्त्वाचा ठरला. त्यांनी दलितांना विहिरीमधून पाणी घेण्याचा व मंदिरामध्ये प्रवेश करण्याच्या अधिकार दिला तसेच कोणत्याही विरोधाला न जुमानता दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

लोकांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या कोणत्याही राजाला आपल्या राज्यातील सर्व धर्मांच्या व जातीच्या

लोकांमध्ये सलोख्याचे व बंधुभावाचे संबंध असावेत असे वाटत असते. तरच राज्याच्या गाड्या योग्य रीतीने हाकता येतो हे शाहू महाराजांनी ओळखले होते.

ते नेहमी म्हणत, व्यक्तीच्या दृष्टीने धर्म ही बाब महत्त्वाची असेल पण राष्ट्रीय ऐक्याच्या बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये.

त्यांनी हे फक्त बोलून दाखवले नाही तर करून दाखवले गणपती उत्सवाच्या वेळी १८९४ मध्ये शाहू महाराज पुण्यात असताना हिंदू-मुस्लिम वाद झाला होता. त्यावेळी शाहू महाराजांनी सार्वजनिक सभेला हिंदू-मुस्लिम यांच्यात समेट घडून आणावा, अशी भूमिका मांडली. यावरून त्यांच्यातले हिंदू-मुस्लिम ऐक्याचे विचार दिसून येतात. दोन वर्गातील भेद नष्ट व्हावा यासाठी राज्य सत्तेच्या अधिकाराचा सुयोग्य वापर करणारं नेतृत्व त्यांनी जोपासलं. समाजाची सुधारणा म्हणजे देशाची सेवा हे एकमेव ब्रीद त्यानी डोळ्यांसमोर ठेवले. एवढेच नव्हे तर स्वतःच्या बहिणीचा विवाह एका धनगर समाजातील मुलाशी ठरवून जाती संस्था नष्ट करण्यामध्ये स्वतःपासून सुरुवात करून समाजासमोर आदर्श घालून दिला.

४८ वर्षाचे आयुष्य मिळालेल्या शाहू महाराजांनी २८ वर्षाच्या कारकीर्दीत आपल्या अफाट कार्याने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्राचा चेहरा मोहरा बदलून टाकला. लोकराजा हा सामान्यांना अपील कोर्टासारखा वाटावा आणि कर्तृत्ववानांना त्याचा आधार वाटावा असा असावा. शाहू महाराज हे असेच होते म्हणून ते एक केंद्रबिंदू बनले होते. लोहचुंबकाकडे लोखंडाचे कण धाव घेतात. त्याचप्रमाणे लोक त्यांच्याकडे धाव घेत. राजर्षी शाहू महाराज हे केवळ वारसा हक्काने राजे नव्हते तर ते लोकांचे लोककल्याणकारी राजे होते महाराजांच्या कार्यामुळे आणि विचारांमुळे महाराष्ट्राच्या नव्हे तर भारतीय समाजाच्या विकासात मोठे योगदान मिळाले. त्यांच्या विचाराने अनेक कार्याने अनेक पिढ्याना प्रेरणा मिळेल.

सत्ता वैभव नावलौकिकाची मुळीच नव्हती आस
जनकल्याणासाठीच घेतला जीवनाचा प्रत्यक्ष श्वास
होते खरे ते दीनदलीत गरिबांचा आवाज
लोक कल्याणकारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज

***



## योगात्मा काकासाहेब वराडकर

चोहीकडे पारतंत्र्याचा घोर अंधकार
अज्ञान तिमिरी लोपला जनसागर
दीनदुबळ्या द्यावया मायेचा आधार
जन्मले कुणकावळे गावी विठ्ठलराव
बालवयी संस्कार जाहले ते थोर
स्वकर्तृत्व पूर्ण केले शिक्षण अपार
रेल्वेतूनी मिळवली पोटापाण्याची शिदोरी
परि रमले ना मन मोहमायेच्या सागरी
दिसत होती समोर आपल्या गावाची वेस
दारिद्र्यात गुरफटला होता कोकण प्रदेश
सेवा करण्या काकांनी घेतला वैद्यकीचा वसा
कट्टा गावी उमटला धन्वंतरीचा ठसा
अज्ञानाच्या काळोखात लावली ज्ञानाचे ज्योत
आश्रम मिडल स्कूल स्थापन केली रुजवात
वाहिले आपुले जीवन सारे जनसेवेपायी
कैसर ई हिंद तुम्हा बोलती दिशा दाही
कट्टा पंचक्रोशी तर वृक्ष बहरला ज्ञानाचा
आदर्श ठेवू सदैव योगात्मा काकासाहेबांचा !

समीर अशोक चांदरकर
कलाशिक्षक
वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कट्टा

# हुशार मुलगा

**संचित राजन गावडे**
इयत्ता आठवी अ

एका गावात एक मुलगा राहत होता त्याचे नाव रामू होते तो शाळेतून येताना रोज एका दुकानात थांबायचा. एकदा काय झालं की तो मुलगा रोजच्या प्रमाणे त्या दुकानासमोर थांबला असताना एका गाडीतून दोन लोक बाहेर आले आणि त्या लोकांनी रामूला सांगितले की तू आमच्या बरोबर गाडीत बस आम्ही तुला घरी न्यायला आलो आहोत रामुनेही कोणतेही आढेवेढे न घेता तो त्या गाडीत बसला व त्यांच्याबरोबर गाडीने जायला निघाला ती  दोन माणसं म्हणजे मुले पळवणारी टोळी होती त्यानी रामुला आपल्या घरी नेले आणि मुले पळवणाऱ्या टोळीतील म्होरक्याने रामुला मोबाईल देत त्याला घरी फोन करण्यास सांगून  वडिलांकडून दहा लाख रुपये माग असे सांगितले

टोळीच्या म्होरक्याने केलेली मागणी ऐकून रामूने आपल्याला कोणी नाही मी अनाथ आहे असे सांगितले रामूने असे सांगताच  ते दोघेही  संतापले व त्याने सांगितले की तू आम्हाला कसेही करून दहा लाख रुपये आणून दे ! त्यावर रामू म्हणाला की, मी काम करून थोडे पैसे जमा केले आहेत ते मी तुम्हाला देईन  रामूने असे सांगताच त्यांनी ते पैसे कोठे आहेत ते आम्हाला सांग असे रामुला सांगितले त्यावर रामू म्हणाला ते पैसे कोठे ठेवले आहे ते  मलाच माहित आहे

रामूने असे सांगताच मुले पळविणाऱ्या त्या टोळीतील एकाने दमबाजी करीत  रामुला आपल्या सोबत घेतले आणि त्यानंतर ते  सगळेजण निघाले थोडे फार दूर गेल्यावर रामूने एका दुकानासमोर गाडी थांबवायला सांगून त्यांना गाडीत थांबायला सांगितले  मुले पळविणाऱ्या त्या टोळीने रामू वर विश्वास ठेवून त्याला गाडी बाहेर पाठविले रामू लागलीच समोरच्या त्या दुकानात गेला व त्याने दुकानातून पोलिसांना फोन करून बोलावले एव्हढ्यात  पोलीसही  आले व त्यानी गाडीतील त्या दोघांच्या मुसक्या आवळल्या यावेळी पोलिसांनी रामूच्या पाठीवर कौतुकाची थाप मारीत त्या



अट्टल चोरांना पकडून दिल्याबद्दल शासनाने जाहीर केलेले दहा लाख रुपयांचे बक्षीस दिले या घटनेने रामूचे सारे जीवनच बदलून गेले.

***

## आई

आईच्या मांडीवर झोपून उठलो आम्ही
परत आम्हाला तिच्याच मांडीवर झोपावंसं वाटतं
आईच्या शब्दांनी जगलो आम्ही
आईच्याच शब्दांनी जगावंसं वाटतं
उगाच आईला त्रास देऊ नका
तिनेच आपल्याला घडवलंय
तिनेच वाटेवरून चालायला शिकवलय
आपण पण त्याच वाटेवरून चालायचंय...

मधुर अर्जुन पेंडूरकर
इयत्ता : ५ वी



## जीवन

ते आकाश काय ज्यामध्ये तारा नसेल,
तो समुद्र काय जो खोल नसेल
तो रस्ता काय ज्यामध्ये दगड नसेल
ते जीवन काय त्यामध्ये संघर्ष नसेल ।।१।।

तो सूर्य काय ज्याला ताप नसेल
तो चंद्र काय  जो शीत नसेल
तो पाऊस काय ज्यात वीज नसेल
ते जीवन काय ज्यात संघर्ष नसेल ।।२।।

तो जन्म काय ज्यात प्रकाश नसेल
ती गोष्ट काय जिला अंत नसेल
तो पतंग काय ज्याला स्वातंत्र्य नसेल
ते जीवन काय ज्यात संघर्ष नसेल ।।३।।

ते कर्म काय ज्यात कष्ट नसेल
तो जन्म काय ज्यात ध्येय  नसेल
ते युद्ध काय ज्याला अर्थ नसेल
ते जीवन काय ज्यात संघर्ष नसेल।।४।।

ओमकार रोहीलकर
इयत्ता : ८ वी

## चांद्रयान ३

भारताचा गौरव करण्यास
निघाले चांद्रयान
धन्य ते कवी गण ज्यांनी
इस्त्रो चे गायिले गुणगान
लहरला तिरंगा चंद्रावर
त्यास पाहुणी डोळे दिपले
भारताचा इतिहास रचाया
चंद्रभूमीवर चंद्रयान तीन झळकले
दूर होता तो चंद्र
आता तो ही जवळ येणार
पाहता पाहता जग सारे
इस्त्रोची प्रशंसा करणार
गोष्ट, चित्र,कविता मध्ये
चंद्राची महती दिसत होती
मानव पोहोचला चंद्रावरती
चंद्रयान ३ ची गाथा पूर्वी कधीही नव्हती
गौरव करूया त्या वैज्ञानिकांचा
उत्सव करूया त्या अनमोल दिनाचा
माहिती तंत्रज्ञान विकसित होणार
चांद्रयान ३ सर्वांसाठी अविस्मरणीय ठरणार

कु. सिद्धाली लक्ष्मण पांचाळ
इयत्ता : १२ वी (कॉमर्स)



# एनसीसी... कभी अलविदा ना कहना!

**जानवी संदीप देसाई**
इयता दहावी

माझ्या शालेय जीवनातील एन.सी.सी.चा प्रवास शब्दात मांडणे सोपे नाही. एफ.वाय.ला सीनियरकडून शिकलो तर आता सीनियर बनवून ज्युनिअरला शिकवत आहे. खरंतर यामुळे झोप येतच नाही. कारण मला पण नीट सांगता येत नाही, जगलेले हे क्षण हळूहळू आठवणी बनून राहतील

एन.सी.सी.मध्ये केलेले कॅम्प, सी.ए.टी.सी.चा रगडा पनिशमेंट... रगडा बेड टच.... फ्रंट रोल... फुल इन या सगळ्या गोष्टी आज आठवणी बनून राहिल्या आहेत आणि हो जय हिंद सीनियर.... येस सीनियर.... सॉरी सीनियर ....हे शब्द आठवले की... हे सारे शब्दात मांडणे कठीण आहे पण CATC आणि TSC कॅम्पचा आम्हा एन.सी.सी. कॅडेटना आलेला अनुभव हा काही औरच आहे

एनसीसीमध्ये प्रवेश घेतल्यापासून आजपर्यंत मी तीन कॅम्पमध्ये सहभागी झाले. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात माझे एनसीसीमध्ये सिलेक्शन झाले होते. एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर मी सन २०२३ मध्ये दिनांक १२ एप्रिल २०२३ ते २१ एप्रिल २०२३ या कालावधीत झालेला टी.एस.सी. चा पहिला कॅम्प तर ११ एप्रिल २०२३ चा झालेला टी. एस.सी.चा दुसरा कॅम्प तसाच आरडीसीचा तिसरा कॅम्प तीन ऑक्टोबर २०२३ ते ८ ऑक्टोबर २०२३ ला पार पडला. या सर्व कॅम्पमुळे माझ्यासारख्या सामान्य विद्यार्थिनीला वेगळी शिस्त लागली. ज्यामुळे माझ्या आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळाली. कॅम्पच्या पहिल्या दिवशी आम्हा सर्व कॅडेट्सना एकत्र जमा करून सूचना देत राहण्याची सोय केली. कॅडेट्स म्हणून हे सर्व मला नवीन तर होतेच, पण एक वेगळाच अनुभव देखील मिळत होता. पहिला अर्धा दिवस तर आरामदायी गेला खरा पण संध्याकाळी साडे पाच वाजता रोल कॉल आणि बोला कॉल साठी बोलावून कॅम्पची व कॅम्पमध्ये होणाऱ्या विविध स्पर्धा यांची माहिती दिली गेली . दररोज सकाळी चार वाजता लवकर उठणे, रनिंगसाठी जाणे, व्यायाम करणे, झुंमा हा आमचा दहा दिवसांचा सकाळचा कार्यक्रम ठरलेलाच होता. कॅम्पमध्ये आम्हा कॅडेट्सला मॅप रिडिंग, कॅम्पस वेपन, ट्रेनिंग तसेच आरोग्य शिक्षण, योगा, राष्ट्रीय एकता, एकात्मता यासारख्या विषयांची माहिती दिली गेली. यात विशेष ठरला तो फायरिंगचा अनुभव! आयुष्यात पहिल्यांदाच ०.२२ रायफल ने फायर करण्याचा अनुभव मिळाला. चार-पाच दिवसांचा सराव करून घेतला होता. फायरिंगच्या वेळी घ्यावयाची काळजी याकडे विशेष लक्ष दिले गेले. एके दिवशी एका निर्माणच्या ठिकाणी आम्हाला फायरिंगसाठी घेऊन गेले. ज्या ठिकाणी प्रत्येक कॅडेटला पहिल्या वेळी पाच गोळ्या फायर करण्याची संधी मिळाली. त्या वेळेपासून माझ्या मनातील फायरिंगची भीती दूर केली.

नंतरचा रगडा तो म्हणजे आरडीसी कॅम्प होता. या कॅम्प वेळी तर भरपूरच रगडा आम्हाला कॅडेट्सना मिळाला होता. पण तितकीच शिस्त आमच्या अंगी लागली होती. या कॅम्पमध्ये मी भरपूरच काही शिकले जसं की ड्रिल फायरिंग, इंटरव्यू, लेखी परीक्षा आणि विविध विषयांची ओळख मला या कॅम्पमध्ये मिळाली. या कॅम्पध्ये सांस्कृतिक कार्यक्रम देखील घेतले गेले. ज्यात विविध कॅडेट्सने आपले कलागुण सादर केले. मी माझ्या शाळेतून एकटीच असल्याने या कॅम्पमध्ये मला बरेच नवीन मैत्रिणी भेटल्या. ज्या दुसऱ्या शाळेतील, दुसऱ्या गावच्या होत्या. पण या दहा दिवसात खूप आपले आणि जवळचे झाले होते. माझ्या मैत्रिणींचा परिवार वाढला होता तो फक्त एनसीसीमुळेच! खरंच... एन.सी.सी.मधील ती दोन वर्ष कशी व कधी निघून गेली आणि आता या दोन वर्षाच्या प्रवासाचा निरोप घेण्यासाठी उंबरठ्यावर येऊन पोहोचताना एनसीसीचा मित्रपरिवार दूर होतोय ही खंत आहेच. माझा हा प्रवास मी हृदयाच्या कप्प्यात जपून ठेवला आहे बरं का... हा प्रवास इथेच संपला म्हणून वाईट वाटत आहे हे खरं आहे. मात्र एनसीसीमुळे माझा पुढील जीवन प्रवास सुखरूप होणार याचा आनंदही वाटत आहे.

***



## चंद्र

दिसता तू नभात
हुरहुर मनी वाटे
का असे होत असे
ना कुणा कळत असे
राञी निरव शांततेत तू
देत असे लख्ख प्रकाश
सर्वांचे मन करत असे
तेजाने प्रकाशमान
दिवसा तू नसावा
पण भास मला व्हावा
का नससी तू दिवसा
प्रश्न मला पडावा
आठवण तुझी येता
नजर माझी जाई नभात
अमावास्येच्या राञी
तू मात्र अंधारात
पृथ्वीचा तू उपग्रह
तुझ्या कला ही निराळ्या
गंमत तुझी वाटे
लहानग्या मुलांना

कु. सिद्धाली लक्ष्मण पांचाळ
इयत्ता : १२ वी



## कोकण

काय असा शहरात?
एकदा कोकणात रवान बघा
धावपळीचे दिस जगण्यापेक्षा
गावची हवा खावन बघा
पाठवून सगळेच आसतत
वांगडा कोणच नसता
पैसो कितीव कमावलास तरी
पायाखालीच रस्तो असतो
वरवर गेलास म्हणान
तुमचे पाय नाय वडूचव
खयचोव वायट काळ आसलो
तरी तुमची साथ नाय सोडूचव
लांबच्या पल्ल्यार रवण्यापेक्षा
सुखाचे दिस जगष्यात
परक्याच्या दारात बसण्यापेक्षा
हयली कोकणी माणुसकी बगशात
कोकणापासून लांब रवलास म्हणान
बिऱ्हाड रडत रडत जगतली
डोळ्यातसून पडणाऱ्या पाणयान
तुमका तान भागवची लागतली

कु. सिद्धी सूर्यकांत नेरुरकर
मॅडम : डॉ दादासाहेब वराडकर
महाविद्यालय कट्टा, ता. मालवण

# ह्योच आमचो दशावतार!

**द्वितीज द.गवाणकर**
इयत्ता बारावी

परशुरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी म्हणजे कोकण भूमी! साक्षात प्रति स्वर्गाचा आभास निर्माण करणारी भूमी म्हणजे कोकण भूमी आणि विविध कलेची सांगड घालत कोकणची परंपरा, संस्कृती जपणारी भूमी म्हणजे आपली कोकण भूमी! अशा या कोकणातील एक पारंपारिक विशिष्ट आकर्षक आणि पिढ्यानं पिढ्या जतन केलेली आणि कोकणवासीयांचा श्वास असणारी कला म्हणजे दशावतार!



तब्बल आठशे वर्षापूर्वी कर्नाटक राज्यातून बाळकृष्ण मोरे यांनी ही कला आपल्या भूमीत आणली दशावतारी ही अशी एक कला आहे ज्यात कलाकार हा स्वावलंबी असतो. आपण साधे आरशात बघून काही करायचे म्हटले तर ते आपल्याला अवघडच. पण तोच दशावतारी कलाकार विविध पात्रांची रंगभूषा छोट्याशा आरश्याचा आधार घेऊन करतात, एवढच नव्हे तर फक्त रंगभूषा नव्हे तर वेशभूषा एक कलाकार स्वतः करतो कोणत्याही पाठांतरीत संवादाचा आधार न घेता तो स्पष्ट बोलतो की साक्षात देवगुरू बृहस्पतीच त्याच्या मुखातून ते शब्द वदवितात का असा प्रश्न पडतो कोणतीही अपेक्षा न ठेवता आपल्या कलेसाठी तो स्वतःला समर्पित करतो अठरा विश्व दारिद्र्य जरी असले घरी तरी तो असतो राजा आपण कधी कधी सहज बोलून जातो की रात्रीचा राजा आणि सकाळी पाठीवर बोजा पण हे वाक्य त्याच्या जीवनातील संघर्ष सांगून जातो संसाराची चिंता जरी असली मनी तरी प्रेक्षकांसमोर त्याला हसावं लागतं. छोट्याशा रंगमंचावर दाखवतो त्रैलोक्याचे दर्शन आणि लाकडाचा बाकड्याला भासवतो रत्नजडित सिंहासन आणि म्हणूनच चार खुंटीच्या मंडपात भरवतो आम्ही राज दरबार हीच आमची कला आणि ह्योच आमचो दशावतार!

***



## निखळला एक तारा

ध्यानीमनी नसताना अचानक
विपरीत घडले....
आमचे लाडके नाईक सर
आम्हाला सोडून गेले...
स्तब्ध झालं मन
मोकळं झालं क्रीडांगण,...
सर तुमच्या जाण्यानं
हादरून गेले अनेकजण...
खूप नशीबवान आहोत आम्ही
तुमच्यासारखे गुरु आम्हाला लाभले
वराडकर हायस्कूल कट्टाचे
नाव तुम्ही उंचावले....
सर तुमच्या विना शाळेला
शोभा नाही तुम्ही नसल्याची
जाणीव आम्हाला
सदैव जाणवत राहील....
शाळेच्या शताब्दीचे स्वप्न दावूनी
तुम्ही आम्हाला सोडून गेलात...
वाटलं नव्हतं एवढ्या लवकर
इथे तुमची प्राणज्योत...
लखलखत्या तेजाचा तुमच्या रूपाने
निखळला आहे एक तारा...
माणसातला माणूस नव्हे तर
तुमच्यातला देव माणूस हरपला

कु. वैभवी सुनील बागवे
इयत्ता : १२ वी (कॉमर्स)

## बाबा



बाबा...
तुम्ही मला काय देता
तुम्ही मला सर्व काही देता
तुम्ही माझे सर्व हट्ट पुरवता
तुम्हीच तर माझे बाबा आहात
बाबा...
तुम्ही आमच्यासाठी कष्ट घेता
आम्हाला सर्व काही आणून देता
तुम्ही आमचे सर्वदाता
तुम्हीच तर माझे बाबा आहात
बाबा....
तुमचं प्रेम असतं अबोल
पण जगण्याचा आधार कुठेही
असो तुमचा माझ्या पाठीशी आधार
म्हणूनच गगनाला गवसण्यास मिळतो आधार
तुम्हीच तर माझे बाबा आहात
बाबा...
कुटुंबाचे छत्र तुम्हीच आहात
मायेची सावली धरणारे तुम्हीच आहात
प्रत्येक संकटाला सामोरे जाणारे तुम्हीच
आहात
तुम्हीच तर माझे बाबा आहात
बाबा...
तुम्हीच म्हणजे जीवन प्रेरणा
न थकणारी माणुसकी
सतत झटणारी माया
आणि कुटुंबासाठी केलेली अखंड सेवा
तुम्हीच तर माझे बाबा आहात

नवनीत सोमनाथ परब
इयता : १० वी

# कला उत्सव....एक अविस्मरणीय प्रवास

**कुमारी श्रेया समीर चांदरकर**
इयत्ता दहावी अ




माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील प्रतिभा ओळखून त्यांच्यामधील कलागुणांना वाव देण्यासाठी शालेय शिक्षण व साक्षरता विभाग शिक्षण मंत्रालय नवी दिल्ली यांच्यामार्फत २०१५-१६ पासून कला उत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते यामध्ये देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश आपला सहभाग नोंदवितात

सन २०१५ पासून आमच्या शाळेचे विद्यार्थी कला उत्सव या स्पर्धेमध्ये सहभागी होत आहे त्यामध्ये नृत्य, नाटक, गायन, वादन, चित्रकला, शिल्पकला आणि खेळणी बनवणे या कलाप्रकारांमध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर सहभागी होऊन आपले कौशल्य दाखवीत आहेत गेल्या वर्षी सन २०२३- २४ मध्ये झालेल्या या स्पर्धेत जिल्हास्तरावर आमच्या शाळेतील अठरा विद्यार्थ्यांचे सहभाग घेतला होता यामधील सानिया कुडतरकर (खेळणी बनवणे) मिथिल आंगचेकर (त्रिमित शिल्प) श्रेया चांदेकर (त्रिमित शिल्प ) अवधूत आचरेकर (पारंपरिक नृत्य) या चार विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड झाली

जिल्हास्तरीय स्पर्धेपेक्षा राज्यस्तरीय स्पर्धा खऱ्या अर्थाने आव्हानात्मक होती कारण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्याचे प्रत्येक कला प्रकारात बहुसंख्येने विद्यार्थी या स्पर्धेत आपले कला कौशल्य दाखविण्यासाठी व स्पर्धेत अव्वल येण्यासाठी प्रयत्नशील असतात एका जिल्ह्यातून एकाच प्रशालेतील सर्वाधिक चार विद्यार्थी हे आमच्या प्रशालेतील होते.

नोव्हेंबर २०२३ मध्ये तीन दिवसात नृत्य, नाटक, गायन, वादन, चित्र, शिल्प या स्पर्धा संपन्न झाल्या विद्यार्थ्याने एकापेक्षा एक सरसकला प्रकाराचे

सादरीकरण केले या तीन दिवसात अनेक नवनवीन गोष्टी शिकता आल्या नवीन मित्र मैत्रिणी भेटल्या उत्सुकता होती ती निकालाची! सिंधुदुर्ग जिल्ह्यातून आम्ही एकूण १९ विद्यार्थी विविध कला प्रकारांच्या माध्यमातून सहभागी झालो होतो निकाल लागला आणि आम्ही आनंदाने एकच जल्लोष केला माझा (त्रिमित शिल्प )व सानिया कुडतरकर (खेळणी बनवणे) यामध्ये राज्यस्तरीय प्रथम क्रमांक आला तसेच आमच्याच प्रशालेतील मिथिल आंगचेकर ( त्रिमित शिल्प ) आणि अवधूत आचरेकर (पारंपारिक नृत्य) यांचा राज्यस्तरावर तृतीय क्रमांक आला आता खरी परीक्षा होती ती दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेची!

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण पाच विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती या आमच्या प्रशालेतील आम्ही दोघी विद्यार्थिनी सहभागी झालो ९ ते १२ जानेवारी २०२४ या कालावधी दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा संपन्न झाल्या स्पर्धा जानेवारी महिन्यामध्ये असल्याने दिल्ली येथे कडाक्याची थंडी होती एक वेगळा अनुभव मला या स्पर्धेमुळे मिळाला राष्ट्रीय स्तरावर विविध राज्यातील विद्यार्थ्यांचे कलाप्रकार, त्यांची भाषा, वेशभूषा अनुभवता आली आणि राष्ट्रीय पातळीवरील आमच्या शाळेचे प्रतिनिधित्व करता आले याचा अभिमानही वाटला! खूप सारे आनंदाचे क्षण आणि राष्ट्रीय स्पर्धेचा एक वेगळा अनुभव घेऊन आम्ही माघारी परतलो या संपूर्ण प्रवासात आमच्या प्रशालेतील कलाशिक्षक श्री समीर चांदरकर सर यांचे मार्गदर्शन लाभले खरंतर या सगळ्यासाठी आमची प्रेरणा बनून आम्हाला प्रोत्साहित करणारे माजी मुख्याध्यापक संजय नाईक सर यांचे फार मोठे सहकार्य लाभले आज ते आमच्यात नाहीत त्यामुळे त्यांची उणीव क्षणोक्षणी जाणवते विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे आम्हाला नेहमी सहकार्य लाभले.

***




# गणित भाषण

**सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय?**
**शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल काय?**
**सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय?**

गणिताचा विषय निघाला की हे गाणं हमखास आठवतं पण बालमनाला सुट्टी आणि मौज एवढ्याच गोष्टी कळतात पण विश्व गणिती भाषेत लिहिले आहे. असे ज्यावेळी गॅलिलिओ म्हणतो त्याचवेळी गणिताची व्याप्ती किती मोठी आहे, हे लक्षात येते. आपल्याला गणिताचा कंटाळा येतो गणित हा विषय अभ्यासक्रमात नकोसा वाटतो. आपल्या जीवनातून गणितच वजा केले तर काय होईल? बघा जरा विचार करून ! गणित हा केवळ अंकांचा खेळ नसून अतिउत्तम विचार करण्याची सर्वश्रेष्ठ पद्धत आहे. आईन्स्टाईनचा = $mc^2$ या समिकरणाने प्रगतीची कवाडे खुली केली.

अंक गणित सुबह मेरी बीजगणित से शाम रेखावो मे खिची हुई है मेरी उम्र तमाम मेरी उम्र तमाम मेरी उम्र तमाम!

**कुमारी ध्रुवी महेश भाट**
इयत्ता : नववी

# मैत्री

**कुमारी अक्षता मंगेश थवी** (अकरावी)
वराडकर इंग्लिश मीडियम स्कुल कट्टा

प्रत्येक व्यक्तीला सर्वात जवळचा असा कोणी वाटत असेल तर तो म्हणजे मित्र ! मैत्रीशिवाय मनातल्या भावभावना दुसरा कोणी समजून घेईल का? जर कोणी समजून घेतलं तर त्याला मित्र व्हाव लागतं. आपल्याला मित्र असावा असे प्रत्येकाला वाटतं आणि ते वाटणं सहाजिकच आहे.

मैत्री व्हायला वेळ लागत नाही, पण खरा मित्र व्हायला प्रचंड वेळ लागतो. मित्र हे मजा मस्ती करणारे, प्रेमळ, संकटकाळी मदत करणारे, वाईट मार्गावर जाताना रोखणारे, प्रसंगी हक्काने रागावणारे आणि कौतुक करणारे अशी अनेक रूप ही मैत्रीची असतात.

मित्र म्हणजे आपल्या जवळचा व आपल्या समस्या जाणून घेणारा... आपला मूड नसताना देखील आपल्याला मनवणारा... आपल्या बरोबर राहून अवगुण दाखवून देणारा... आपल्या मित्राच्या डोळ्यात अश्रू पाहून रडणारा.... माझ्या मते मैत्री म्हणजे.... विश्वास, प्रेम ! मैत्री हा शब्द कुठल्याही अलंकारात स्पष्ट करणे योग्य नाही कारण मैत्री ही केवळ मित्रत्वातूनच.... एकमेकांवरील विश्वासातूनच दिसून येते. जो व्यक्त न करता मनातील भावना ओळखतो तो खरा मित्र ! मैत्रीमध्ये स्त्री, पुरुष , धर्म असे भेदभाव नसतात प्रत्येक नात्याची सुरुवात ही मैत्रीपासून सुरू होते. मैत्री ही भांडणारी हवी पण, कधी न बोलणारी नको ! मित्र हे एकमेकांवर प्रेम करणारे, एकमेकांवर डोळे झाकून विश्वास ठेवणारे असावेत. शरीराने जरी वेगळे असले तरी मनाने एक असणारे असावेत जो व्यक्त न करता मनातील भावना ओळखतो तो खरा मित्र !




प्रत्येक नात्याची सुरुवात ही मैत्री पासून होते मैत्री एका वृक्षाप्रमाणे असते जो स्वतः उन्हात उभारून दुसऱ्याना सावली देतो. मैत्री ही भांडणारी हवी पण कधी न बोलणारी नको. मित्र एकमेकांवर प्रेम करणारे, एकमेकांवर डोळे झाकून विश्वास ठेवणारे असावेत. शरीराने जरी वेगळे असले तरी मनाने एक असणारे असावेत.

*मैत्रीच्या प्रकाशाने*
*क्षितिजाला गाठले*
*मिठीत तुला घेऊन*
*हायसे वाटले*
*सूर्यालाही तुझे कोवळे*
*ऊन मनापासून भावले*
*भेट घेण्या मित्रा तुझी*
*तारेसुद्धा धावले*

***

‘वंदना’ वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!





# झांटये

## मेडिकल आणि जनरल स्टोअर्स

**निलेश झांटये**

मु. पो. कट्टा, बाजारपेठ, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

फोन : (०२३६५) २२५३०६, मोबा. : ९४२२६६९३०६.

‘वंदना’ वार्षिक अंकास हार्दिक शुभेच्छा..!






# कमलेश ट्रेडर्स

## अल्ट्राटेक सिमेंट

**अधिकृत वितरक - सिंधुदुर्ग**

मु. पो. कट्टा, बाजारपेठ, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

फोन : ७९७२५०१६७४.

E-mail.id : ravindrakudtarkar67@gmail.com

# संस्कृत भाषा.... शिदोरी संस्कारांची !

**सिमरन समीर चांदरकर** सहा शिक्षिका
वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टा



**संस्कृत दिनाचे निमित्ताने जीवनावश्यक वस्तूंचे प्रदर्शन मांडताना त्यांचे संस्कृत भाषेतील शब्द वर्णिवले आहेत.**

भाषासू मुख्या मधुरा दिव्या गिर्वाण भारती.... म्हणून जिचा गौरव केला जातो ती संस्कृत भाषा.

भाष्यते अनेन इति भाषा। अर्थात ज्या माध्यमातून आपण व्यक्त होऊ शकतो ती भाषा होय. पण भाषा हे केवळ व्यक्त होण्याचे माध्यम नसते तर ते त्या समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, तत्त्वज्ञानिक अशा अनेक पैलूंचे प्रतिबिंब असते. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात भाषिक वैविध्य असल्याने अगदी कोसावर भाषा बदलताना दिसते. पण या भाषा वैविध्यात भारताच्या समृद्ध संस्कृतीचे प्रकर्षाने दर्शन घडते ते संस्कृत भाषेत. भारतीय धार्मिक, साहित्य, तत्त्वज्ञान, पुराण कथा इतिहास हे सारे संस्कृत मध्येच आहे. इतकेच नव्हे तर प्राचीन भारतीय विज्ञान, वैद्यक, नाट्यशास्त्र, संगीत, अर्थशास्त्र अशा अनेक विषयांवर संस्कृतमध्ये विपुल ग्रंथसंपदा आहे. म्हणून संस्कृतिः संस्कृताश्रिता। हे वचन सार्थ ठरते. संस्कृतमध्ये जे बोलतो तेच लिहिले जाते. यामुळेच लेखन कले शिवाय फक्त मौखिक परंपरेतून वेद कुठलीही चूक न होता पिढ्यानपिढ्या संरक्षित राहिले. संस्कृत भाषेत इतके विपुल शब्द भांडार आहेत की तसे इतर कुठल्याच भाषेत नसावे. संस्कृतमध्ये पाणी या शब्दासाठी दीडशेहून अधिक पर्यायी शब्द आहेत. बैलासाठी ६० हून अधिक, हत्तीला शंभरच्या वर सिंहाला ८० च्या वर नावे आहेत. स्त्रिया शब्दाकरता योषिता, नारी, अर्धांगिनी, वामांगिनी, वामा असे अनेक शब्द संस्कृतमध्ये आहेत. हा प्रत्यक्ष शब्द स्त्रीची सामाजिक कौटुंबिक आणि धार्मिक भूमिका दर्शवतो. पण आधुनिक काळातल्या शब्दांना देखील संस्कृतमध्ये पर्यायी शब्द निर्माण करता येतात. नवनवीन शब्दांची निर्मिती ही व्याकरणाच्या सहाय्याने करता येते. उदाहरणार्थ पेन ड्राईव्ह – स्मृतिशलाका, पासपोर्ट– पारपत्र, लॉगिन संप्रवेश त्यामुळे इतर भाषांमधून शब्दांची उसनवारी करण्याची गरज संस्कृतला भासत नाही.

असा हा समृद्ध असणारा संस्कृत विषय सिंधुदुर्ग जिल्ह्यात काही ठराविक शाळांमध्येच शिकवला जातो. यापैकी आमची वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टा ही एक

प्रशाला आहे. मुलांमध्ये संस्कृत भाषेविषयी अभिरुची निर्माण व्हावी तसेच भाषेवरील प्रभुत्व, शब्द संपदा वाढावी यासाठी आमच्या प्रशालेत विविध उपक्रम राबवले जातात.त्यापैकी महत्त्वाचा उपक्रम म्हणजे  संस्कृत दिन. आमच्या प्रशालेत संस्कृत दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावेळी विद्यार्थी संस्कृतमध्ये संभाषण, संस्कृत गीत गायन, कथाकथन विविध वस्तूंना संस्कृतमध्ये संबोधण्यात येणारे शब्द प्रत्यक्ष सादर करतात. आपल्या रोजच्या वापरातील विविध वस्तूंना संस्कृत मध्ये कोणती नावे आहेत. हे जाणून घेण्यासाठी विविध वस्तू आणि त्यांचे संस्कृत मध्ये नाव यासंबंधीचे प्रदर्शन भरवले जाते. अगदी पाचवी सहावीपासून विद्यार्थ्यांमध्ये या विषयाची जाणीव जागृती व्हावी यासाठी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध संस्कृत विषयक परीक्षांचे आयोजन केले जाते. संस्कृत विषय विद्यार्थी सहज आत्मसात करतात. त्यामुळे माध्यमिक शालांत परीक्षेतही या विषयाचा निकाल शंभर टक्के लागून जवळपास चार ते पाच विद्यार्थी हे पैकीच्या पैकी गुण प्राप्त करतात. निश्चितच भविष्यात या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होतीलच त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये ही वाढ होऊ शकते.

***

# भारताची अंतराळातील कामगिरी

**कुमारी मयुरीका अमित मांजरेकर**
इयत्ता नववी

२३ ऑगस्ट हा दिवस रात्री अंतराळ दिवस म्हणून घोषित करण्यात आला आहे. रशियाची स्कूटनिक एक आग्रह अंतराळात सोडला व अंतराळ युगाची सुरुवात केली. विज्ञान व तंत्रज्ञान खेळ या क्षेत्रांबरोबरच भारताने अंतराळ क्षेत्रात देखील आपला ठसा उमटवला आहे. अंतराळ संशोधनात भारताचे उल्लेखनीय कामगिरी दिसून येते. भारत अंतराळ विज्ञानातील एक अग्रगण्य देश मानला जातो. हा जगामध्ये आंतरराष्ट्रीय ठाकरे सर असणाऱ्या दहा देशांमध्ये भारताची गणना केली जाते. भारतीय उपग्रह प्रक्षेपण कार्यक्रमाला १९८३ मध्ये सुरुवात करण्यात आली. विक्रम साराभाई यांना अंतराळ कार्यक्रमाचे जनक म्हणतात. भारताने अंतराळात अनेक उपग्रह प्रक्षेपित केले. भारताने १९७५ मध्ये आर्यभट्ट हा पहिला उपग्रह अवकाशात सोडला. त्या व्यतिरिक्त भास्कर एक रोहिणी एप्पल भास्कर, दोन इन्सॅट एक बी. चंद्रयान एक, चंद्रयान दोन, चंद्रयान तीन इत्यादी.

भारताने आतापर्यंत १११ उपग्रह प्रक्षेपित केले आहेत व अंतराळ क्षेत्रात आपले घवघवीत यश संपादन केले आहे. भारताचा उपग्रह निर्मितीतला वाटा हा खूप मोठा आहे. या यशामध्ये इस्त्रो या संस्थेचे मोठे योगदान आहे. आतापर्यंत इसरोने खूप सारे उपग्रह प्रक्षेपित केले आहेत व या संस्थेचा अवकाश अंतराळ संशोधनात मोलाचा वाटा आहे. उपग्रह निर्माण करण्यासाठी बनवण्यासाठी भारतात शिक्षण दिले जाते. चांगले अंतराळवीर बनवण्यासाठी भारत कायम प्रयत्नशील असतो. राकेश शर्मा हे भारतातले पहिले अंतराळवीर होते. अंतराळ विज्ञानाच्या संशोधनासाठी भारतीय वैज्ञानिक अनेक अनेक संस्थांवर सोबत जगभर काम करीत आहेत. अंतराळ विज्ञानाच्या विकासाला हातभार लावत आहेत.

विक्रम साराभाई यांच्या नेतृत्वाखाली यांच्या आग्रहावरून १९६२ मध्ये पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय अंतराळ संशोधन समिती स्थापन केली. विक्रम साराभाई व होमी भाभा या दोघांनी एकत्रित भारताच्या अंतराळ विकासात आपला मोलाचा वाटा दिला आहे. साराभाई हे अंतराळ कार्यक्रमाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. चंद्रयान तीन हा भारताने प्रक्षेपित केलेला उपग्रह असून तो एक महत्त्वाचा उपग्रह होता. उपग्रह चंद्रावर उतरवण्यात आला. चंद्रयान ३०० प्रक्षेपण २३ ऑगस्ट २०२३ रोजी श्रीहरीकोटा येथून प्रक्षेपित करण्यात आले. हा उपग्रह चंद्राचा दक्षिण बाजू पाहण्यासाठी व त्याबद्दल अभ्यास करण्यासाठी होता. हा उपग्रह यशस्वी झाल्यावर भारताला खूप प्रसिद्धी मिळणार होती. संशोधनास मदत होणार होती. अशा प्रकारे भारताने खूप उल्लेखनीय अशी कामगिरी केली आहे. १९८३ ते आतापर्यंत भारताने या क्षेत्रात खूप प्रगती केली आहे. भारताची अंतराळातील कामगिरी ही गौरवास्पद आहे. आजच्या या भारताच्या यशामध्ये अनेक वैज्ञानिक व संस्थानांचे कष्ट व योगदान आहे. भारत यापुढेही अशी नवनवीन प्रगती करत राहील. भारत आपली संशोधन प्रक्रिया अधिक विकसित करण्याचा प्रयत्न करत आहे.

# ज्ञान आणि बुद्धीचा आश्रयदाता... आमचे नाईक सर !

**प्रथमेश सदानंद जाधव**
(अकरावी - वाणिज्य)

सरांनी आम्हाला जगायला शिकवल,
आयुष्याकडे बघायला शिकवल,
सगळे रस्ते जेव्हा बंद होतात
तेव्हा एक नवीन रस्ता शोधायला शिकवलं

कै.संजय सुभाष नाईक सर... एक आदर्श शिक्षक आणि समाजसेवक होते. त्यांनी वराडकर हायस्कूल एक नवी दिशा दिली आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सतत कार्यरत राहिले. राजकीय क्षेत्रातही त्यांनी लोककल्याणासाठी कार्य केले. त्यांचे शाळेसाठीचे योगदान सदैव स्मरणात राहील. सामाजिक , राजकीय शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्य, कला, क्रीडा क्षेत्रात काम केलेले वराडकर हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय सुभाष नाईक सर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जायचे. त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल समाजात मोठ्या आदराने पाहिले जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेत शैक्षणिक दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम राबविले गेले. त्यांच्या निधनाने समाजात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

नाईक सर हे एक आदर्श मुख्याध्यापक, आदर्श शिक्षक, समाजसेवक आणि राजकीय क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व होते. वराडकर हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडवले. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली. विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनामुळे आत्मविश्वासाने उजळले आणि शिक्षणाची खरी महत्ता ओळखली. शिक्षक म्हणून नाईक सरांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही तर त्यांना जीवनाचे पाठ शिकवले. वर्गात शिकवणे हे केवळ एक काम नव्हते तर त्यांच्यासाठी ते एक कर्तव्य होते. त्यांची शिस्तप्रिय परंतु मैत्री पूर्ण वागणूक विद्यार्थ्यांमध्ये आदर निर्माण करणारे होते. समाजसेवक म्हणून त्यांनी समाजातील अपेक्षित घटकांच्या कल्याणासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेकांना आधार मिळाला आणि समाजात एकत्वाची भावना निर्माण झाली. त्यांच्या विचारसरणीत सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन होता, त्यामुळे त्यांच्या कामात सातत्य आणि समर्पण दिसून येत होते. नाईक सर हे एक उत्कृष्ट वक्ते होते. त्यांची भाषण नेहमीच प्रभावी आणि प्रेरणादायी असायची त्यांच्या विचारांमध्ये दृष्टिकोन आणि अनुभवाची गोडी होती, जी विद्यार्थ्यांना आणि श्रोत्यांना मार्गदर्शन करायची. सरांच्या शब्दांमध्ये प्रचंड शक्ती होती, त्यांच्या भाषणामुळे श्रोत्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण व्हायचा, नाईक सर हे उपक्रमशील मुख्याध्यापक, पुरस्कार प्राप्त एक प्रेरणादायी शिक्षक तज्ञ होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात शाळेतील शिक्षण प्रणाली सुधारण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या उपक्रमशीलतेमुळे त्यांना उपक्रमशील मुख्याध्यापक या पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात आदर्श निर्माण केला आणि त्यांची आठवण त्यांच्या कार्यामुळे कायम राहील.

मुख्याध्यापक नाईक सर यांच्या प्रेरणेने आणि नेतृत्वाखाली शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शाळेचे वातावरण स्वच्छ आणि सुंदर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायक बनवणे होते. शाळेने या उपक्रमांतर्गत अनेक गोष्टी केल्या. शाळेच्या परिसराची स्वच्छता विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज सुविधा

वर्ग खोल्यांचे सुशोभन व वृक्षारोपण, पर्यावरणपूरक उपक्रम तसेच शैक्षणिक सामग्रीचा दर्जा उंचावणे या सर्व गोष्टींचा समावेश करण्यात आला. नाईक सरांनी शिक्षक विद्यार्थी आणि पालक यांना एकत्र आणून एक संघटित प्रयत्न केला, ज्यामुळे शाळेला हा गौरव प्राप्त झाला. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने आदर्श निर्माण केला आहे, जो इतर शाळेसाठी ही प्रेरणादायी ठरू शकतो. विद्यार्थी पालक आणि स्थानिक समुदायाचा समन्वय साधून शाळेचा सर्वांगीण विकासासाठी मेहनत घेतली. शाळेच्या सौंदर्यीकरण, शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा आणि विविध उपक्रमांची अंमलबजावणी यात त्यांच्या नेतृत्वाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे शाळेला तालुक्यातील सर्वोच्च मानांकन मिळाले शाळेच्या मेहनतीचे फलित होय.

नाईक सर हे शिक्षण क्षेत्रात आदर्श मुख्याध्यापक म्हणून ओळखले जात होते. त्यांनी नेहमीच आपल्या शाळेतील शिक्षकांना समजून घेतले आणि त्यांना प्रोत्साहन दिले, ते सर्व शिक्षकांसाठीच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व होते. सहकार्याची भावना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मुख्य भाग होती. त्यांनी आपल्या शाळेतील शिक्षकांसोबत केवळ शैक्षणिक प्रश्नांवरच चर्चा केली नाही तर त्यांच्या वैयक्तिक अडचणींवर देखील मदत केली. नाईक सर नेहमीच आपल्या सहकाऱ्यांना आत्मविश्वासाने कार्य करण्यासाठी प्रेरित करत असत आणि त्यांना योग्य मार्गदर्शनही देत असत. मुख्याध्यापक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही विशेष प्रयत्न केले. ते केवळ अभ्यासावरच नाही तर विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यावरही लक्ष केंद्रित करत असत.

नाईक सर यांच्या नेतृत्वाखाली शाळेतील वातावरण सदैव सकारात्मक आणि सहकार्याशी राहिले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचा आयोजन केले, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साह मिळाले. नाईक सरांनी शिक्षकांच्या व्यवसायिक आणि वैयक्तिक विकासासाठी आवश्यक त्या संधी उपलब्ध करून दिल्या ते नेहमीच म्हणायचे की एक शिक्षकाचा विकास म्हणजे विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याची साठी एक पाऊल आहे. त्यामुळे त्यांनी शिक्षकांना नवनवीन शैक्षणिक पद्धती शिकवण्यास आणि त्या शाळेत लागू करण्यास प्रोत्साहित केले. त्यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने शिक्षकांना एक नवीन ऊर्जा मिळाली.

